# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 12 | Marathi Monthly | Thane, 1 June 2024 to 30 June - 2024 | Pages 16 | Price : 10/-


# पुणे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांच्या 'तथाकथित' हप्तेबाजीप्रकरणी,

## पुण्याच्या पालकमंत्र्यांवर कठोर-कायदेशीर कारवाई करण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) :** पुण्यातील अपघात दुर्घटनेनंतर, शहरात उशिरापर्यंत सुरु असणारे पब, बार आणि हुक्का पार्लर्स यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला गेला. याच पार्श्वभूमीवर, पुणे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांच्या 'तथाकथित' हप्तेबाजी प्रकरणी, काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात धडक देत, त्यांनी उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना धारेवर धरल्याचे आणि त्यामाध्यमातून दर महिन्याला, पब आणि बारमधून वसूल करण्यात




येणाऱ्या हप्तेबाजीचे 'तथाकथित' प्रकरण उघड केल्याचे वृत्त प्रसिद्धीमाध्यमांतून समोर आले आहे. **सदर हप्तेबाजीतून दरमहा ७० ते ८० लाखांची वसुली करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. यातून ज्या पब व बारमधून वसुली केली जाते, त्यांची नावे आणि ज्या पोलिसांकरवी संबंधित रक्कम गोळा केली जाते, त्या हप्तेखोर पोलिसांची नावे रवींद्र धंगेकर व सुषमा अंधारे यांनी जाहीर केलेली आहेत. ही बाब नक्कीच संतापजनक असून, पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर असणाऱ्या आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या शहरासाठी निश्चितच लाजिरवाणी अशी घटना असल्याची टीका 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तसेच राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे.**


**दरम्यान, पुणे शहराच्या कल्याणीनगर परिसरात, वेदांत अग्रवाल नावाच्या मुलाने, मद्यपान करुन, बेदरकारपणे गाडी चालवित दोनजणांचा जीव घेतल्यानंतर, या दुर्घटनेला फक्त संबंधित आरोपी मुलगा किंवा त्याचा बिल्डर बाप हेच जबाबदार नसून, संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थाच जबाबदार असल्याचे समोर आले आहे.** यात पोलीस प्रशासन, ससून रुग्णालयातील डॉक्टर्स आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी कसे बरबटलेले आहेत, हेच सुस्पष्ट झालेले आहे. मुळात प्रत्येक जिल्ह्याचा पालकमंत्री हा, दर महिन्याला प्रशासकीय आढावा बैठक घेत असतो. **मात्र, पुण्याचे महामहीम पालकमंत्री हे, कायदा आणि सुव्यवस्था धाब्यावर बसविण्यातच धन्यता मानत आहेत की काय? असा रोखठोक सवाल नितीन देशपांडे यांनी, आपल्या पत्रातून उपस्थित केला असून, या संपूर्ण प्रशासनाचे प्रमुख असणारे पुण्याचे पालकमंत्री हेच या संपूर्ण घटनाक्रमाला जबाबदार असून, त्यांचा वरदहस्त असल्याशिवाय अशाप्रकारची हप्तासंस्कृती पुणे शहरात फोफावूच शकत नाही, असा थेट करण्यात आला आहे. याच अनुषंगाने, दुर्दैवी तरुण-तरुणीच्या मृत्यूस, जेवढा बिल्डरपुत्र वेदांत अग्रवाल जबाबदार आहे, तेवढेच पुण्याचे पालकमंत्रीदेखील जबाबदार असून, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे.**

## देशाच्या लोकशाहीचा 'DNA' सुरक्षित राखण्याकामी 'NDA'ला का गाडायचं आणि 'INDIA-आघाडी'ला का निवडायचं... ''इंडिया, एक आयडिया'', मालिकेतील

लेख-अनुक्रमांक ४


...पृष्ठ क्र. ४ वर

अंतरंग



दिल्लीपर्यंत यायला पैसे नाहीत... 'पद्मश्री'.... पोस्टाने पाठवा साहेब!

पृष्ठ क्र. २



भारताचे पहिलेवहिले व अत्यंत लाडके पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु...

...राजन राजे

पृष्ठ क्र. १३




खाजगी 'क्लासिकल-भांडवलशाही' आणि 'कॉर्पोरेट-भांडवलशाही'

...राजन राजे

पृष्ठ क्र. १४

# दिल्लीपर्यंत यायला पैसे नाहीत... 'पद्मश्री'.... पोस्टाने पाठवा साहेब!




**ज्याच्या नावापुढं कधीच कुणी ''श्री'' लावलं नव्हतं, ज्याच्याकडे संपत्ती म्हणून काय होतं; तर, कपड्याचे फक्त तीन जोड, तुटलेली एक रबरी चप्पल, एक जुनाट चष्मा आणि रोख ७३२ रुपये फक्त. त्याला जेव्हा चक्क ''पद्मश्री'' पुरस्कार जाहीर झाला तेव्हा, त्याने सरकारला कळवलं की, दिल्लीपर्यंत यायला पैसे नाहीत... ''पद्मश्री''.... पोस्टाने पाठवा साहेब! अजब आणि अफाट आहे नं हे?**

मी सत्यकथा सांगतोय, ओडिशातील हलधर नाग या अवलियाची. कोसली भाषेत कविता लिहिणारे प्रसिद्ध कवी. कहर म्हणजे, त्यांनी आजवर जितक्या कविता आणि वीस महाकाव्य लिहिली आहेत, ते सर्व त्यांना तोंडपाठ आहे आणि आता तर, संभलपूर विश्वविद्यालयात त्यांच्या हलधर ग्रंथावली : भाग-२ याचा पाठ्यक्रमात समावेश करण्यात आलाय.

साधाच वेष, शक्यतो पांढरं धोतर, गळ्यात गमछा आणि बहुतेक वेळा अनवाणी फिरणारे हलधर एक अफलातून अवलिया आहेत. ते खरंतर इंडियन आयडॉल आहेत... पण, कचकड्याच्या दुनियेतील 'रियालिटी शो'मधल्यांना आपले चॅनेलवाले हिरो करतात, आयडॉल ठरवतात. खरे आयडॉल तर, हलधरजीसारखे आहेत. चॅनेलवाल्याचे यांच्याकडे लक्ष कधी गेले; तर, त्यांना ''पद्मश्री'' जाहीर झाल्यावर. हलधरजी यांची जीवनकहाणी तुम्हालाही प्रेरणा देऊन जाईल. म्हणून तर, हा लेखप्रपंच...

ते एका अत्यंत गरीब-हरिजन कुटुंबातून आलेले, आईवडिलांचे निधन झाल्याने, वयाच्या दहाव्याच वर्षी हलधरजी अनाथ झाले. त्यामुळे त्यांना इयत्ता तिसरीतच शाळा सोडावी लागली. **पोटासाठी इतक्या लहान वयात ते ढाब्यावर खरकटी भांडी विसळण्याचे काम करु लागले. त्यानंतर एका गृहस्थाला त्यांची दया आली व त्यांना एका शाळेच्या स्वयंपाकघरात काम मिळाले. तिथं थोडं स्थिरस्थावर आयुष्य त्यांना मिळालं. नंतर बँकेकडून त्यांनी शंभर रुपये कर्ज घेऊन पेन-पेन्सिल-शालेय वस्तूंच्या विक्रीचे छोटेसे दुकान टाकले आणि उदरनिर्वाह त्यातूनच भागवू लागले...** आता त्यांच्यातील साहित्यिक कौशल्याबद्दल सांगतो. हलधरजी यांनी, १९९५च्या सुमारास स्थानिक उडिया भाषेत ''राम-शबरी''सारखे काही धार्मिक प्रसंग निवडून, त्यावर स्फुट लिहून ते लोकांना ऐकवू लागले. भावनेने ओथंबलेले त्यांचे ते शब्द ऐकताना लोक गुंग होऊन जायचे. पाहता पाहता त्यांच्या रचना प्रचंड लोकप्रिय झाल्या. हळूहळू ती कीर्ती सर्वदूर पसरु लागली. अनेक नामांकित लेखक/कवींनी त्यांची दखल घेऊन, विविध वृत्तपत्रांतून त्यांच्याबद्दल भरभरुन लिहिले आणि अखेर दिल्लीपर्यंत त्यांची ही कीर्ती पोहोचली आणि त्यांना चक्क साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल ''पद्मश्री'' पुरस्कार जाहीर झाला. अजून एक कहर म्हणजे, स्वतः हलधरजी फक्त तिसरीपर्यंत शिकलेले; पण, आजमितीस पाच पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी त्यांच्या साहित्यावर ङ्पीएचडीफ करत आहेत. त्यांच्याबद्दल इतकंच म्हणावसं वाटत की, ''आप किताबो में प्रकृति को चुनते है...

पद्मश्री ने, प्रकृति से किताबे चुनी है!'' डीडी क्लास : भोवती अनुकूल काहीच नसतानाही, यश खेचून आणणारे, दगडालाही फोडून त्यातून बाहेर उगवून येणारे हलधरजीसारख्या लोकांची चरित्रे का वाचायची? तर, आपल्यात व आपल्या पुढच्या पिढीत त्यातूनच ऊर्जा यावी. **''सगळी परिस्थिती वाईट आहे, नाही-तर मी नक्कीच काहीतरी करुन दाखवलं असतं!'' अशी कारणे देऊन, निराश झालेल्यांसाठीच, ही आजची हलधरजी यांची कहाणी ठेवली... शेवटी मी नेहमी सांगतो तेच आज पुन्हा सांगतो, काहीही होवो... रडायचं नाही; तर, लढायचं आणि लढून जिंकायचं !!!**

*समाजमाध्यमातून साभार*

---




गौतम बुद्धाने युवराजपद, राज्यपद व सत्तेचं सिंहासन सोडलं आणि त्याचसोबत, आपली प्राणप्रिय पत्नी, यशोधरेचा त्याग करुन 'अंतिम सत्याचा शोध' घेत... जगद्कल्याणासाठी जंगलाची वाट धरली...तर, 'भांडवली-व्यवस्थे'नं घडवलेला आणि 'अंधभक्तां'नी प्रसवलेला, नरेंद्र मोदी नावाचा 'नवाबुद्धू' ('नवाबुद्ध' वगैरे नव्हे); पाशवी-सत्तालालसेपोटी आपल्या पतिव्रता पत्नी यशोदामैय्याचा त्याग करुन, 'असत्याचा सदैव आधार' घेत... ल्युटेनस् दिल्लीच्या (ब्रिटीश वास्तुविशारद सर एडविन ल्युटेनचं, स्वातंत्र्यपूर्व काळातील ऐतिहासिक बांधकाम असलेला, दिल्ली-सत्ताधीशांचा विभाग) झगमगत्या दुनियेची वाट धरता झाला...

ज्याला, 'पप्पू' बनवण्यासाठी आणि 'पप्पू' म्हणून हिणवण्यासाठी एक हजार कोटींपेक्षा अधिक खर्च केला गेला व त्याकामी अर्णव गोस्वामीसारख्या 'मेंदूविक्या-दलाल' पत्रकारांची कुबुद्धी, मोठ्याप्रमाणावर खर्ची घातली गेली...तोच, राहुल गांधी, आज शड्डू ठोकून 'टेलिप्रॉम्प्टर'च्या सहाय्याने भाषणांचा रतीब घालणाऱ्या, नरेंद्र मोदींना खुल्या चर्चेचं आव्हान देतोय....'नियतीच्या कठोर न्याया'चं, हे उलटं फिरलेलं चक्र, 'ध्रुव राठी'च्या पोलखोल करणाऱ्या व्हिडीओतून पहा आणि त्याच्याच प्रभावी शब्दात ऐका...धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## पतंजलीच्या रामदेव बाबाला सर्वोच्च न्यायालयाने टोमणा मारला, ''तुमची जाहिरात ढीगभर आणि तुमची माफी टीचभर''!

म्युच्युअल फंडाच्या जाहिराती पानभर आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीत जोखीम असते, ही छोट्याशा 'लाईन फॉंट सिक्स'मध्ये किंवा ऑडिओ जाहिरातीतील पुरुष, ते जोखमीचे वाक्य १०० पट वेगाने पुटपुटतो.

रिझर्व बँक, सेबी, आय.आर.डी.ए., पी.फ.आर.डी.ए., कंपनी लॉ बोर्ड... ही नियामक मंडळे... बँका, कंपन्या यांना काही नियम पाळले नाहीत, म्हणून अधून मधून दंड करतात. पायावर हळूच चापटी मारल्यासारखी बँका, कंपन्या नियम न पाळून... त्यातून जो धंदा करतात किंवा नफा मिळवतात, त्याच्या तुलनेत दंडाची रक्कम क्षुल्लक असते... ते हसत हसत दंड भरतात.

**कनेक्ट द डॉट्स...**

काहीजण म्हणतात की, मी 'सिस्टीम'वर चांगली टीका करतो. तरुणांनो, मी किंवा माझ्यासारखे म्हातारे कधीच पुरे पडणारे नाहीत. राजकारणी, मिडीयात ज्यांची नावे येतात, त्या व्यक्ती यांच्यात फार अडकू नका. 'सिस्टिम-केंद्री' विचार करायला शिकणे, त्यासाठी आवश्यक ते भिंग डोळ्यात बसवणे, मेंदूत अँटेना बसवणे... हे महत्त्वाचे आहे.

माहिती गोळा करण्यापेक्षा, माहितीच्या Analysis वर भर द्या. वेळ लागेल... पण, एकदा क्रॅक केले की, काम सोपे होतेच, आपल्याला आर्थिक, बँकिंग, वित्त यामधले काही कळत नाही, हा न्यूनगंड फेकून द्या, हे मूठभर लोकांचे काम होऊ शकत नाही. याचा 'कारवाँ' बनला पाहिजे... तो तरुणांशिवाय बनू शकत नाही.

मी जे लिहीतो, हे त्यासाठी लिहीतो... तुम्ही प्रतिसाद देत आहातच, तसाच देत रहा व कृतिशील बना!

*...संजीव चांदोरकर*

# ठाण्यातील घोसाळे तलाव, कासवांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी घोषित करावा !

## 'धर्मराज्य पक्षा'ची महापालिका आयुक्तांकडे मागणी...

ठाणे (प्रतिनिधी) : केंद्र शासन पुरस्कृत अमृत-२ अभियानांतर्गत, ठाणे शहरातील घोसाळे तलावाच्या सुशोभीकरणाचे काम मुदत संपली तरी चालू आहे. हा तलाव ऐतिहासिक असून, ठाणे गॅझेटमधे या तलावाचा उल्लेख असून, ८२५ फूट लांब आणि ४९५ फूट रुंद असलेल्या या तलावाची जास्तीतजास्त खोली १६ फूट आहे. या तलावात वर्षभर पाणी असते व सिंचनासाठी यातील पाण्याचा उपयोग होत असतो. मात्र, महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने, अनैसर्गिकरित्या घोसाळे तलावाचे सुशोभीकरण केल्यामुळेच, यातील कासवांचा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला असल्याने, या तलावाला कासवांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी घोषित करण्यात यावे, अशी मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांच्याकडे लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, महापालिका आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, २३ मे हा दिवस, 'कासव दिन' म्हणून भारतासह, संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून, मोठ्याप्रमाणावर कासवांची तस्करी होत असल्यामुळे, काही दुर्मिळ प्रजाती धोक्यात आल्या आहेत. निसर्ग आणि जैवविविधतेचे महत्त्व, काळाची गरज आणि पर्यावरण-साखळी अबाधित राहावी म्हणून कासव वाचविणे व संवर्धन करणे महत्त्वाचे असून, भारतीय संविधान ५१-अ (जी) नुसार नैसर्गिक जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे शासनास कटिबद्ध रहाणे बंधनकारक असल्याचे त्यांनी आपल्या पत्रात ठामपणे नमूद केले आहे.



दरम्यान, कासवांमध्ये नैसर्गिकरीत्या पाणी स्वच्छ व निर्मळ करण्याची क्षमता प्रचंड असून, भविष्यात पाणी स्वच्छ रहाण्यासाठी विजेवर चालणारी उपकरणे लावण्याची गरजही भासणार नाही. घोसाळे तलावात प्रचंड प्रमाणात कासवे असणे याचा, जैवविविधता व पर्यावरणीय संबंध आहे व त्याचे संरक्षण व संवर्धन करणे हे आपले घटनात्मक कर्तव्य असल्याचे, नितीन देशपांडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. यावेळी आयुक्तांचे लक्ष वेधताना, देशपांडे यांनी पुढे म्हटले आहे की, तलावात केलेल्या पिचिंग कामामुळे एकाच बाजूला कासवे दिसत आहेत, याची गंभीर दखल घ्यावी. सुशोभीकरणाच्या नावाखाली आपण कासवांच्या नैसर्गिक अधिवासावर गदा आणत आहात, हेच यावरून स्पष्ट होत असून, संविधानानुसार ही बाब अजिबात मान्य नसल्याने, याची तत्काळ दखल घेण्यात यावी आणि सुशोभीकरण करताना, कासवांच्या व इतर जलचरांच्या संरक्षण, संवर्धनासाठी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने नेमकी काय व्यवस्था केली, याची माहिती जाहीर करावी वा तशी केली नसल्यास, तत्काळ तज्ज्ञाकडून सल्ला घेऊन अंमलात आणावी व कासवांची शिकार होऊ नये म्हणून, तत्काळ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आणि सुरक्षा व्यवस्था लागू करण्यासोबतच, घोसाळे तलाव हा कासव संरक्षण व संवर्धन तलाव म्हणून सुरक्षित करून, ठाणे महानगरपालिकेने पर्यावरण, जैवविविधता याबाबत, संपूर्ण भारतातील आगळेवेगळे स्थान निर्माण करण्याची संधी घालवू नये व ठाण्यातील नैसर्गिक जैवविविधतेची साखळी अबाधित रहाण्यास प्रयत्नपूर्वक काम करावे, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना लिहिलेल्या पत्रात ठळकपणे केली आहे.

---




...शिवाय, ''बेटी बचाओ, बेटी पढाओ'' व ''महिला-सुरक्षितते''चा बोगस नारा देणारे आणि बलात्कारितांना नव्हे; तर, बलात्कार्यांना संरक्षण देणारे बृजभूषणच्या पोराच्या उमेदवारीने अजून पुन्हा एकवार साफ उघडे पडलेत...पण, 'मन की बात' करणाऱ्यांना, ''जनाची नाही; तर, निदान 'मना'ची तरी थोडी लाज वाटावी''???



# देशाच्या लोकशाहीचा ‘DNA’ सुरक्षित राखण्याकामी ‘NDA’ला का गाडायचं आणि ‘INDIA–आघाडी’ला का निवडायचं... ‘‘इंडिया, एक आयडिया’’, मालिकेतील लेख–

## अनुक्रमांक ४

### ही राजा ‘हरिश्चंद्राची फॅक्टरी’ नव्हे...

‘गुजराथी–लॉबी’कडून चालवल्या जाणाऱ्या ‘हिंदुत्वा’च्या राजकीय–फॅक्टरीतून बाहेर पडणारा तयार–माल म्हणजे... ‘‘असत्य, अन्याय, अत्याचार आणि अमानुष शोषण’’!

ही ‘गुजराथी–लॉबी’, हिंदुत्वाच्या नावाखाली प्रथमतः मुसलमान, मग शेतकरी, नंतर लष्करी सेवेत जाऊ पहाणारे नवतरुण आणि आता कामगार, अशी सर्वांवरच हल्लाबोल करतेय... यांना तळागाळातील सगळ्यांचाच तिरस्कार आहे.

मोजक्या लोकांच्याच हातात सत्ता–संपत्ती ठेवायची, वर्णवर्चस्ववादी–शोषक मानसिकता त्यामागे आहे!

...चुकलेल्याला, गुन्हेगाराला शासन करणं, सजा देणं वेगळं आणि एखाददुसरा गुन्हेगार, दहशतवादी सापडला म्हणून त्यांच्या संपूर्ण जातधर्म–समाजाचाच तिरस्कार करणं वेगळं! जातधर्मीय दंगल घडवणारा कुणीही असो, हिंदू असो वा मुसलमान वा अन्य कुणी...कुठल्याही दंगेखोराचा, निःशस्त्र व निष्पाप नागरिकांवर उगारलेला शस्त्रधारी हात, खाली येण्यापूर्वीच त्याच्या छातीचा वेध पोलिसांच्या किंवा लष्कराच्या हातातील बंदुकीच्या गोळीने घेतलाच पाहिजे...शिवछत्रपतींच्या नीतिनुसार त्यात कुणालाही दयामाया दाखवण्याचा, भेदाभेद करण्याचा प्रश्नच कुठे उद्भवतो?

तेव्हा, ‘‘प्रतिकार वेगळा आणि तिरस्कार वेगळा...’’

‘‘जो एकाचा तिरस्कार करतो, तो सगळ्यांचाच तिरस्कार करत असतो आणि जो एकावर निरपेक्ष प्रेम करतो; तो अवघ्या मानवतेवर प्रेम करत असतो’’, हे लक्षात ठेवा!

‘सत्यवचनी राम’ काय सांगतो? कृष्ण काय शिकवतो गीतेत...व्यक्तिवर की, प्रवृत्तीवर लक्ष केंद्रित करायला?

मोदी–शहा...अंबानी–अदानीसारख्यांनी, आपल्या ‘कर लो दुनिया मुठ्ठी में’ अशा बकासुरी स्वार्थापोटी चालवलेली, हिंदूधर्माला ‘बदनाम’ करणारी, ही बनावट हिंदुत्वाची ‘फॅक्टरी’ आहे!

भारतीय–अध्यात्माचा पायाच मुळी ‘सत्यमेव जयते’ आहे...सुर्याच्या हिरण्यगर्भासारखं प्रखर–तेजस्वी असलेलं ‘सत्य’, हे भारतीय–अध्यात्मात सदैव, ‘परमेश्वरस्वरुप’ मानलेलं असताना... ‘असत्या’चा आधार घेत, सतत घृणास्पद राजकारण करणारे तथाकथित ‘हिंदुत्ववादी’, स्वतःला हिंदूदेखील म्हणवून घेण्याच्या देखील लायकीचे नाहीत!

या बनावट हिंदुत्ववाद्यांनी कधि राजा हरिश्चंद्राची’’ परंपरा, ओझरती तरी पाळलीय? सत्यवचनी रामाचं मंदिर बांधता, स्वप्नात दिलेलं वचन पाळणारा राजा हरिश्चंद्र आमचा म्हणता...आणि, तुमची एवढी वाईट अवस्था की, तुम्हाला साधं खरं बोलणं, सत्य सांगणं... अशक्यप्राय व्हावं? रोज रोज नवीन थापा, नवनवीन जुमले.

प्रेमळ–वत्सल–न्यायी व प्रजेप्रति नको तेवढा अतिसंवेदनशील असलेल्या रामाला रागीट, उग्र, क्रुद्ध ‘श्रीराम’ बनवता तुम्ही? ही रामाची सरळ सरळ बदनामी नव्हे तर काय??

‘‘एकीकडे ‘गोमाता’ म्हणणार आणि ‘‘गाय हा फक्त, एक उपयुक्त पशू आहे’’, हे सावरकरांचं वचन, त्यांच्या अनेक ‘माफीनाम्यां’सारखंच दडवून ठेवणार; शिवाय, दुसरीकडे ‘गोमांस’ (Beaf) विकणाऱ्या कंपन्यांकडून आणि पाकिस्तानच्या ‘हब–पॉवर’ (HubPower) कंपनीकडून करोडोंचे इलेक्टोरल–बॉण्ड्स् स्विकारणार’’ आणि वरुन, कुठल्या तोंडाने हे स्वतःला ‘हिंदुत्ववादी’ म्हणवणार?

...कसल्या हिंदुत्वाच्या गप्पा मारतायत हे, थापेबाज??

...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



‘जुमले’वाल्यांचं सरकार आलं की, ‘जुलूम’ सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही....

अयोध्येत राममंदिर बांधलं यांनी; पण बेरोजगारी, महागाई, नोकरीच्या ठिकाणी ‘कंपनी–दहशतवाद’ (Corporate-Terrorism), हुकूमशाहीतली ‘सरकारी–दहशत’, अमानुष आर्थिक–विषमता, नोटबंदी–इलेक्टोरल बॉण्ड्स्, ‘PMCare’ फंडासारखे या शतकातले सगळ्यात मोठे घोटाळे याद्वारे, तुमच्याआमच्या जगण्यातला त्यांनी ‘राम’ हिरावून घेतलाय...

ILOच्या म्हणण्यानुसार, भारतात ३० वर्षांखालील ८३% नवतरुण बेकार आहेत...अगदी, खखढ्सारख्या सर्वोच्च तंत्रज्ञान–संस्थांमधून बाहेर पडणारे इंजिनिअर्सही आज मोठ्याप्रमाणावर बेरोजगार म्हणून फिरतायत; कारण, यांच्या गेल्या १०वर्षांच्या सत्ताकाळात ‘जॉबलेस–ग्रोथ ते जॉब–लॉस ग्रोथ’ अशी, रोजगारनिर्मिती क्षेत्राची प्रचंड घसरण झालीय; म्हणजेच, जेवढी जेवढी म्हणून मोजक्या महाकाय कंपन्यांची प्रगती होत जाते, तेवढे तेवढे अधिकाधिक रोजगार, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने व घृणास्पद व्यवस्थापकीय डावपेचांनी नष्ट होत जातात. गेल्या १०वर्षांत खाण्याचं तेल तिप्पट, गाड्यांचं इंधन–तेल दुप्पट; तर, स्वयंपाकाचा गॅस अडीचपट महागला. महामार्गांची रुंदी वाढली; पण, कामगार–कर्मचारीवर्गाच्या पगाराच्या पाकिटांची जाडी पूर्ण खंगली...अगदी चिप्पाडं झाली त्यांची. उड्डाणपुलांचं–महामार्गाचं कॉंक्रीटचं जाळं वाढलं; पण, आपल्या व पुढच्या पिढ्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर उभे केले यांनी. जनतेची क्रयशक्ति (खरेदी–शक्ति) घटली, बचत–क्षमता संपुष्टात येऊन कर्ज घेण्याचं प्रमाण बेसुमार वाढलं...गेल्या दोन वर्षात, घरची लक्ष्मी म्हणजेच, घरातलं सोनं गहाण ठेऊन कर्ज घेण्याचं प्रमाण २००० कोटींवरुन मारुतिसारखं कोटीच्या कोटी उड्डाण घेत २६,००० कोटींपर्यंत पोहोचलं!

...याचाच अर्थ, तुम्हाला–आम्हाला कायमचं ‘गुलाम’ बनवू पहातायत ते....

आपली अवस्था, त्या उंदरासारखी त्यांना करुन टाकायचीय, जो एकदा का पिंजऱ्यात कोंडला गेला की, बाहेर पडणं अशक्यच! २०२४ची लोकसभा–निवडणूक, हा तो ‘पिंजरा’ आहे...सावध राहून मतदान केलंत, तर त्या पिंजऱ्यातून वाचाल; नाहीतर, तुमच्यातला ‘माणूस’ हळूहळू मरुन जाईल... त्याची जागा एक ‘गुलाम’ घेईल! तुम्हाला ते उपाशी मारणार नाहीत; तुम्हाला ते निश्चितच तगवतील... १२ तासाला दरमहा १२ हजार पगार देऊन किंवा आज देतात, तसं ८० कोटी लोकांना दरमहा ५ किलो मोफत धान्य देऊन (मात्र, ती किरकोळ मदत, मोदी–शहा सरकारने दिलेली असल्याने, त्याला ‘रेवडी’ म्हणायला ‘बंदी’च); पण, सन्मानाने जगवणार मात्र, नाहीत!

...दावणीला बांधलेल्या, गोठ्यात कोंडलेल्या गुराढोरांसारखं, पुढ्यात टाकलेल्या दर महिन्याच्या ५ किलो चाऱ्यावर गपगुमान गुजराण करायची वेळ आपल्यावर येईल आणि ही भाजपाई–संघीय ‘गुजराथी–लॉबी’ तुमच्या छाताडावर थयथया नाचेल!

सत्यवचनी राम, स्वप्नात दिलेलं वचन पाळणारा राजा हरिश्चंद्र... ही भारतीय–अध्यात्माची मूर्तिमंत प्रतिकं... तर, हे उठताबसता फेकाफेक करणारे राजरोस ‘फेकू’ आणि प्रत्येक भारतीयाच्या खात्यात १५ लाख टाकणारे, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या निर्माण करणारे महानिर्लज्ज ‘जुमलेबाज’!

...तेव्हा, लक्षात ठेवा, ‘जुमले’वाल्यांचं सरकार आलं की, ‘जुलूम’ सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही... त्यांनी लाथा घातल्या तरी, ‘काय छान मालिश केलंत’, शिव्या घातल्या तर, ‘काय छान ओव्या म्हटल्यात’ आणि तोंडावर हे जुमलेबाज थुंकले तरी, ‘काय छान आंघोळ घातलीत’, असं बोलायची नामुष्की आपल्यावर येईल...

तुमच्या त्या ‘शिंदे–पवार’ गटाचं दुसरं काय चाललंय भाजपवाल्यांपुढे? आणि जे, ईडी/आयटी/सीबीआयच्या धाडी पडायला नकोत...म्हणून अगोदरच ढुंगणाला पाय लावून भाजपाच्या दिशेने पळालेत...त्यांचंही वेगळं काय चाललंय?

जगायचंय तुम्हाला असलं ‘गुलामी’चं जीण?? नसेल जगायचं...तर आजचं विचार करुन ठेवा आणि ‘इंडिया–आघाडी’ला साध्या नव्हे; प्रचंड बहुमताने विजयी करा; कारण, त्या EVMच्या किमान काही टक्क्यांच्या हेराफेरीला ओलांडून, आपल्याला ही लोकसभा–निवडणूक जिंकण्याखेरीज दुसरा–तिसरा कुठलाही इतर पर्याय नाही...

## अनुक्रमांक ५

## ‘जुमले’वाल्यांचं सरकार आलं की, ‘जुलूम’ सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही....

अयोध्येत राममंदिर बांधलं यांनी; पण बेरोजगारी, महागाई, नोकरीच्या ठिकाणी ‘कंपनी-दहशतवाद’ (Corporate-Terrorism), हुकूमशाहीतली ‘सरकारी-दहशत’, अमानुष आर्थिक-विषमता, नोटबंदी-इलेक्टोरल बॉण्ड्स्, ‘PMCare’ फंडासारखे या शतकातले सगळ्यात मोठे घोटाळे याद्वारे, तुमच्याआमच्या जगण्यातला त्यांनी ‘राम’ हिरावून घेतलाय...

ILOच्या म्हणण्यानुसार, भारतात ३० वर्षांखालील ८३% नवतरुण बेकार आहेत...अगदी, IITसारख्या सर्वोच्च तंत्रज्ञान-संस्थांमधून बाहेर पडणारे इंजिनिअर्सही आज मोठ्याप्रमाणावर बेरोजगार म्हणून फिरतायत; कारण, यांच्या गेल्या १०वर्षांच्या सत्ताकाळात ‘जॉबलेस-ग्रोथ ते जॉब-लॉस ग्रोथ’ अशी, रोजगारनिर्मिती क्षेत्राची प्रचंड घसरण झालीय; म्हणजेच, जेवढी जेवढी म्हणून मोजक्या महाकाय कंपन्यांची प्रगती होत जाते, तेवढे तेवढे अधिकाधिक रोजगार, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने व घृणास्पद व्यवस्थापकीय डावपेचांनी नष्ट होत जातात. गेल्या १०वर्षांत खाण्याचं तेल तिप्पट, गाड्यांचं इंधन-तेल दुप्पट; तर, स्वयंपाकाचा गॅस अडीचपट महागला. महामार्गांची रुंदी वाढली; पण, कामगार-कर्मचारीवर्गाच्या पगाराच्या पाकिटांची जाडी पूर्ण खंगली... अगदी चिप्पाडं झाली त्यांची. उड्डाणपुलांचं-महामार्गाचं काँक्रीटचं जाळं वाढलं; पण, आपल्या व पुढच्या पिढ्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर उभे केले यांनी. जनतेची क्रयशक्ति (खरेदी-शक्ति) घटली, बचत-क्षमता संपुष्टात येऊन कर्ज घेण्याचं प्रमाण बेसुमार वाढलं...गेल्या दोन वर्षात, घरची लक्ष्मी म्हणजेच, घरातलं सोनं गहाण ठेऊन कर्ज घेण्याचं प्रमाण २००० कोटींवरुन मारुतिसारखं कोटीच्या कोटी उड्डाण घेत २६,००० कोटींपर्यंत पोहोचलं!

...याचाच अर्थ, तुम्हाला-आम्हाला कायमचं ‘गुलाम’ बनवू पहातायत ते....

आपली अवस्था, त्या उंदरासारखी त्यांना करुन टाकायचीय, जो एकदा का पिंजऱ्यात कोंडला गेला की, बाहेर पडणं अशक्यच! २०२४ची लोकसभा-निवडणूक, हा तो ‘पिंजरा’ आहे... सावध राहून मतदान केलंत, तर त्या पिंजऱ्यातून वाचाल; नाहीतर, तुमच्यातला ‘माणूस’ हळूहळू मरुन जाईल... त्याची जागा एक ‘गुलाम’ घेईल! तुम्हाला ते उपाशी मारणार नाहीत; तुम्हाला ते निश्चितच तगवतील... १२ तासाला दरमहा १२ हजार पगार देऊन किंवा आज देतात, तसं ८० कोटी लोकांना दरमहा ५ किलो मोफत धान्य देऊन (मात्र, ती किरकोळ मदत, मोदी-शहा सरकारने दिलेली असल्याने, त्याला ‘रेवडी’ म्हणायला ‘बंदी’च); पण, सन्मानाने जगवणार मात्र, नाहीत!

...दावणीला बांधलेल्या, गोठ्यात कोंडलेल्या गुराढोरांसारखं, पुढ्यात टाकलेल्या दर महिन्याच्या ५ किलो चाऱ्यावर गपगुमान गुजराण करायची वेळ आपल्यावर येईल आणि ही भाजपाई-संघीय ‘गुजराथी-लॉबी’ तुमच्या छाताडावर थयथया नाचेल!

सत्यवचनी राम, स्वप्नात दिलेलं वचन पाळणारा राजा हरिश्चंद्र... ही भारतीय-अध्यात्माची मूर्तिमंत प्रतिकं...तर, हे उठताबसता फेकाफेक करणारे राजरोस ‘फेकू’ आणि प्रत्येक भारतीयाच्या खात्यात १५ लाख टाकणारे, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या निर्माण करणारे महानिर्लज्ज ‘जुमलेबाज’!

...तेव्हा, लक्षात ठेवा, ‘जुमले’वाल्यांचं सरकार आलं की, ‘जुलूम’ सहन करण्याशिवाय पर्याय रहात नाही... त्यांनी लाथा घातल्या तरी, ‘काय छान मालिश केलंत’, शिव्या घातल्या तर, ‘काय छान ओव्या म्हटल्यात’ आणि तोंडावर हे जुमलेबाज थुंकले तरी, ‘काय छान आंघोळ घातलीत’, असं बोलायची नामुष्की आपल्यावर येईल...

तुमच्या त्या ‘शिंदे-पवार’ गटाचं दुसरं काय चाललंय भाजपवाल्यांपुढे? आणि जे, ईडी/आयटी/सीबीआयच्या धाडी पडायला नकोत...म्हणून अगोदरच ढुंगणाला पाय लावून भाजपाच्या दिशेने पळालेत...त्यांचंही वेगळं काय चाललंय?

जगायचंय तुम्हाला असलं ‘गुलामी’चं जीणं?? नसेल जगायचं...तर आजचं विचार करुन ठेवा आणि ‘इंडिया-आघाडी’ला साध्या नव्हे; प्रचंड बहुमताने विजयी करा; कारण, त्या EVMच्या किमान काही टक्क्यांच्या हेराफेरीला ओलांडून, आपल्याला ही लोकसभा-निवडणूक जिंकण्याखेरीज दुसरातिसरा कुठलाही इतर पर्याय नाही...

## अनुक्रमांक ६

## घटनेत दुरुस्ती करणं वेगळं आणि घटनाच बदलणं वेगळं....

राममंदिर न्यायालयीन-निर्णय प्रक्रियेतून बांधलंत (स्वतःच्या निर्णयानुसार नव्हे), रामजन्मभूमीपासून दूर बांधलंत...तरी, सगळ्यांनी स्विकारलं. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काहीसा वादग्रस्त होता, त्यातून न्यायमूर्ती रंजन गोगोई राज्यसभेवर गेल्याचं बोललं जातं...तरीही, अगदी मुस्लिमांनीसुद्धा समजूतदारपणा दाखवून बव्हंशी शांतपणे सगळं स्विकारलं... पण, तुम्ही लोकशाहीवरच, निवडणूक-प्रक्रियेवरच घाला घालू पहाल... तर, हा तमाम भारत, ‘अळीमिळी गूपचिळी’, असा चूप बसणार नाही...तुम्हाला या लोकसभा-निवडणुकीतून तो धडा शिकवेलच!

...हं, आपण म्हणू शकतो की, यांना प्रभूरामाने २०१४ला संधि दिली (अर्थात, तेव्हा हे थापाडे-जुमलेबाज, ‘सब का साथ, सब का विकास’ म्हणत, फसव्या ‘गुजराथ-मॉडेल’ची ढोंगी जाहिरातबाजी करत होते आणि ‘राममंदिर’, हा राजकीय-पटलावरचा विषय नसून, तो ‘आस्थे’चा विषय आहे, असंही म्हणत होते).

‘लांडगा आला रे आला’ अशी बतावणी करणार्याला जशी दोनदा संधि दिली गेल्याची कथा, आपण ऐकत आलोत; तशीच, भारतीय-जनतेनं ‘पुलवामा-हत्याकांड व बालासोर सर्जिकल-स्ट्राईक’ या संपूर्ण संशयास्पद प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, या थापेबाज ‘गुजराथी-लॉबी’ला २०१९मध्ये पुन्हा ५ वर्षांची मुदत वाढवून दिली...पण, त्यांनी संधिचं ‘सोनं’ करण्याऐवजी संधिची ‘माती’ केली... सोनं झालंच नाही कुणाचं, असंही नव्हे...ते अंबानी-अदानीसारख्यांचं झालं...लाखो कोटी रुपयांनी त्यांच्या धंद्यांची, अगदी कोविड-काळातही बरकत झाली आणि तमाम भारतीय जनतेच्या जगण्याची बेरोजगारी, अर्धरोजगारी आणि महागाईने अक्षरशः ‘माती’ झाली!

...हे भोग भोगत असतानाच, आपल्या धमन्या-धमन्यांमधून ‘लोकशाही’चं रक्त व आपल्या उरात व्यक्ति-स्वातंत्र्याच्या उर्मिचं वारं खेळवणाऱ्या भारतीय जनतेवर... ‘तुझी ५ किलो धान्याची भीक नको; पण, तुझा तो ‘सरकारी-दहशती’चा गुरगुरणारा कुत्रा आवर’, असं, दिल्लीच्या हुकूमशहाला सांगण्याची वाईट वेळ आली!

...कालपर्यंत, तथाकथित ‘हिंदुराष्ट्रा’च्या निर्मितीआड येणारी राज्यघटना-संविधान बदलण्याची (म्हणजेच, मुठभरांच्या हातात सत्ता-संपत्ती ठेवणं व महिलावर्गासह बाकी जनतेवर ‘मनुस्मृती’च्या आधारे वरवंटा फिरवणं) उर्मट भाषा बोलणारे...पायाखालची वाळू सरकायला लागली; तसे, अचानक, ‘संविधान-प्रेमी’ बनल्याची नौटंकी सगळ्या जनतेनं नुकतीच पाहिली. ‘लबाड लांडगं स्वांग करतंय’, या मराठी-गाण्याच्या धर्तीवरचं त्यांचं संविधानावरचं ढोंगी प्रेम, एवढं ऊतू गेलं की, ‘‘खुद्द बाबासाहेब आले तरी, संविधान बदलू शकणार नाहीत’’, अशी एकदम कोलांटी उडी मारुन ते गर्जना करत मोकळे झाले!

...अरे, कशाला बाबासाहेबांचं नाव घेता, शोभतं तुमच्या तोंडात? नाव घ्यायचं तर, तुमच्या गोळवलकर गुरुजींचं घ्या...बाबासाहेबांनी स्वतःच राज्यघटनेत घटनादुरुस्तीची यथायोग्य तरतूद करुन ठेवलीय (ज्याला,१९७३ सालच्या, याच एप्रिल महिन्यातल्या २४ तारखेला लागलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा ‘केशवानंद भारती’ सर्वोच्च न्यायालयीन निकालानुसारच्या राज्यघटनेच्या ‘मूलभूत चौकटी’ची मर्यादा आहेच)...पण, तुमच्या ‘काळ्या’ टोपीखालच्या डोक्यात जे ‘काळंबेरं’ आहे ना आणि तुमच्या ‘काळ्या’ मनात जे आहे ना, त्याला उद्देशून आम्ही बोलतो आहोत... ‘‘घटनेत दुरुस्ती करणं वेगळं आणि घटनाच बदलणं वेगळं’’...तुम्हाला घटनाच मुळातून बदलायचीय; केवळ आणि केवळ, ‘‘मोजक्यांच्याच हातात ‘राजलक्ष्मी’ (सत्ता) आणि ‘महालक्ष्मी’ (संपत्ती) ठेवण्याची तुमची वर्णवर्चस्ववादी-शोषक-अत्याचारी मानसिकताच, त्यामागे आहे’’... तेव्हा, मुंबई बॉम्बस्फोटावर आलेल्या ‘ब्लॅक-फ्रायडे’ चित्रपटामध्ये ‘के के मेनन’ या नटाच्या तोंडी एक प्रभावी संवाद (डायलॉग) आठवतो, तो असा... ‘‘पण, यावेळी अल्ला आमच्या बाजुने होता... म्हणून, तुमचं RDX पकडलं गेलं’’. अगदी, त्याचधर्तीवर, लोकशाही-स्वातंत्र्यावर जीव ओवाळून टाकणाऱ्या, समस्त-सर्वधर्मीय भारतीय जनतेनं म्हटलं पाहिजे, ‘‘भले तुम्ही एक नव्हे, अनेक मंदिरं बांधा...हव्या तेवढ्या मंदिरांना भेटी द्या, हव्या तेवढ्या पूजा-होमहवन करा...पण, २०२४च्या लोकसभा-निवडणुकीत ‘राम’, न्यायाच्या; म्हणजे, आमच्या बाजुने उभा आहे’’!

....हो, ही लढत केवळ NDA विरुद्ध INDIA आघाडी अशी नव्हे; तर ती आहे, ‘‘भारतीय जनता पक्ष विरुद्ध भारतीय जनता’’, अशीच!

## अनुक्रमांक ७

## १८व्या लोकसभेची निवडणूक, ही अनेक अर्थांनी ‘लोकविलक्षण’ आहे....

भारतीय-अध्यात्मात १८ या आकड्याला विशेष महत्त्व आहे...१८ पुराणं, गीतेचे १८ अध्याय, १८ दिवस चाललेलं महाभारत युद्ध वगैरे वगैरे!

...त्याचबरोबर, ही स्वातंत्र्याची तिसरी लढाईदेखील

आहे. पहिली स्वातंत्र्याची लढाई, आपण १९४७ साली लाल-बाल-पाल, म. गांधी, पं. नेहरु, वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस इत्यादींच्या नेतृत्त्वातून, त्यागातून आणि भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, अश्फाक उल्ला खान, मंगल पांडे, शिरीषकुमार, बाबू गेनू वगैरे अनेक नरवीरांच्या बलिदानातून ब्रिटीशांविरुद्ध लढलो आणि अखेर स्वतंत्र झालो… त्यानंतर, स्वातंत्र्याची दुसरी लढाई, आपण स्व. इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीविरुद्ध १९७७ साली लढलो आणि आता, त्यानंतर बरोबर ४७ वर्षांनी, ही मोदी-शहा भाजपाई-संघीय सरकारने लादलेल्या अघोषित-बेकायदेशीर आणीबाणीविरुद्ध तिसरी स्वातंत्र्याची लढाई लढतो आहोत. १९७७ साली इंदिरा गांधींनी लादलेली आणीबाणी, 'कायदेशीर मार्गाने आली व कायदेशीर मार्गानेच गेली'…त्यांनी काही विरोधीपक्ष नेत्यांना जरुर तुरुंगात टाकलं होतं; पण, तेव्हा त्या नेत्यांच्याही हातून काही गंभीर अपराध-गुन्हे घडले होते, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. पण, इंदिरा गांधींनी कुठल्याही विरोधी पक्षाची बँक-खाती गोठवून त्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न नव्हता केला आणि एकदा लोकसभा-निवडणूक जाहीर केल्यानंतर, त्यांनी एकूणएक सर्व विरोधकांची सन्मानाने तुरुंगातून सुटका केली आणि लोकशाही-स्वातंत्र्याची बूज राखण्याकामी, देशभरात निवडणुकीसाठी, अगदी मोकळंढाक वातावरण जाणिवपूर्वक ठेवलं. पण, आज जी अघोषित-बेकायदेशीर आणीबाणी भाजपा-सरकारने देशभरात लादलेली आहे; ती वस्तुतः, इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीपेक्षा कैकपटीने भयंकर व देशाच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून खूपच भयावह आहे!

'हा लढा भारतीय जनता पक्ष विरुद्ध INDIA आघाडी असा नसून भारतीय जनता पक्ष विरुद्ध भारतीय जनता' असाच आहे…जे अंधभक्त त्यांच्या पाठीशी आहेत, त्यांचं काय? अहो, ती खरीखुरी देशभक्त भारतीय 'जनता' वगैरे नव्हे; तर ते, वळवळणारे जातधर्मविद्वेषी 'जंत' आहेत…वळवळू द्या खुशाल त्यांना.

प्रथम शेतकरी, मग मुसलमान, त्यानंतर अग्निपथावरचे नवतरुण अग्निवीर आणि सरतेशेवटी कामगार… अशा सगळ्याच तळागाळातल्या लोकांना, हे होरपळून टाकणार आहेत, बरबाद करणार आहेत. त्यात बरेचसे तळागाळातले 'नमोभक्त' किंवा 'अंधभक्त'देखील आलेच; पण, येऊ घातलेल्या भीषण भविष्याबद्दल ते 'अंधभक्त' मनोरुग्ण व नमोरुग्ण झालेले असल्याने त्याबद्दल 'अनभिज्ञ' आहेत… पण, जे सूज्ञ आहेत, ते 'इंडिया-आघाडी'सोबत आहेत.

आपल्या देशाच्या पंतप्रधानाला 'इंडिया' शब्दाची 'ॲलर्जी' आहे का हो? इंडिया शब्द उच्चारताना लाज वाटते की काय त्यांना की, मूळव्याधीसारखा 'सहन होत नाही आणि सांगता येत नाही', असा त्रास होतो?

…'इंडिया' नाही म्हणत, 'इंडी इंडी' करतात…अरे, ती ईडी-आयटी-सीबीआयचा धाक दाखवून आणि सरकारी-कंत्राटांतल्या खोक्यांचं आमिष दाखवून लाटलेली… हजारो कोटींची 'इलेक्टोरल-बॉण्ड'ची 'हंडी', पंतप्रधानांच्या डोक्यात एवढी 'फीट' बसलीय की, त्यामुळेच ते सारखे 'इंडी इंडी' करतात!

## अनुक्रमांक ८

## ''फादर ऑफ नेशन ते फादर ऑफ डोनेशन''….भारताचा अधोगतीचा प्रवास!

२०१४मध्ये नरेंद्र मोदी, मनमोहनसिंगांच्या काँग्रेस-सरकारवर टीका करताना म्हणत होते, ''लोक विचार करत असतात की, सचिन तेंडुलकरची 'सेंच्युरी' प्रथम पुरी होणार की, कांद्याच्या भावाची 'सेंच्युरी' पुरी होणार?''

तेव्हा, गटारातून स्वयंपाकाचा गॅस तयार करणारे आणि पाकिस्तानी रडारला चकवण्यासाठी ढगाआडून बालासोर 'सर्जिकल-स्ट्राईक' करायला लावणारे… 'फेकू-सम्राट' नरेंद्र मोदी, नेहमीप्रमाणेच एक वर्षाअगोदरच (२०१३) क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला सचिन तेंडुलकर, जणू अजूनही फलंदाजी करत असल्याचं, आपल्या राजकीय सोयीसाठी भोळसट जनतेला भासवत होते!

…आणि, विशेष म्हणजे, मनमोहनसिंगांच्या नव्हे; तर, नरेंद्र मोदींच्या कार्यकाळातच 'कांद्याने सेंच्युरी' पार केली होती!

…ना शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या, ना शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट झालं, ना त्यांना किमान आधारभूत किंमत किंवा MSP मिळाली…उलटपक्षी, त्यांना त्यांच्याच शेतातून उखडून फेकून देत शेतजमिनी, मोदींच्या 'गुजराथी-भाषिक' कॉर्पोरेटीय-मित्रांना आंदण देण्यासाठी, 'तीन काळे शेतकी-कायदे' लादण्याचा, निर्घृण प्रयत्न करुन पहाण्यात आला.

खाद्यतेलाचे भाव तिप्पट, स्वयंपाकाच्या गॅसचे अडीच पट; तर, इंधन तेलाचे दुप्पट वाढले… 'महागाई' नावाचा उंदीर, सामान्य जनतेचे खिसे गेल्या १० वर्षात कुरतडत राहिला… 'महागाई' नावाचा कागदावर नसलेला म्हणून 'अदृश्य'; पण, प्रत्यक्षात होरपळून काढणारा व प्रतिपदेच्या चंद्राच्या कलेप्रमाणे रोज वाढणारा 'कर' (Inflation-Tax) एखाद्या निष्णात खिसेकापूसारखा मोदी-सरकारच्या कार्यकाळात, जनतेचे खिसे सतत कातरत राहिला… गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाची घरं भरत राहिला!

'नोटबंदी' करताना जाहीररित्या सांगितलेल्या एकाही उद्दिष्टाची पूर्ति होणं तर खूप दूरच राह्यलं (आणि, असं काही अपयश आल्यास, आपल्याकडे फक्त ५० दिवसांची मुदत मागणारे पं. नरेंद्र मोदी, शिक्षा म्हणून भरचौकात फास लावून घेणार होते)… पण, शंभरावर अधिक माणसं 'नोटबंदी'त केवळ रांगेत उभी राहून मेली; तरी, नोटबंदीचं समर्थन करणारे अजून ढोल बडवतायत; त्यांना, जनतेनं 'व्होटबंदी' करण्याचं मनावर घेतलंय, घ्यायलाच पाहिजे!

…तशीच, शेकड्यांनी माणसं शेतकरी-आंदोलनात मारली गेली, मंत्र्यांच्या मुलाच्या गाडीखाली चिरडली गेली…तरीही, नरेंद्र मोदींचं न थकता गुणगान करणाऱ्या 'अंधभक्तांचं, हे केवळ, भाजपाई-संघीय 'आयटी-सेल'कडून झालेलं 'संमोहन'च नव्हे; तर, ती त्यापलिकडची 'मनोरुग्णता' किंवा 'नमोरुग्णता' आहे!

…आणि, ४ जूनला 'मावळते पंतप्रधान' बनणाऱ्या (सध्या, ते निवडणुका घोषित झाल्यापासून 'हंगामी पंतप्रधान' आहेत) पं. नरेंद्र मोदींच्या अतिशय खालच्या पातळीच्या धर्मविद्वेषी भाषणांना प्रतिसाद म्हणून, आजही चाललेला त्यांचा जल्लोष, समाजमाध्यमांवरची उन्मादी भाषा व विकृत-विखारी संदेश पेरणी…ही सारी थेरं म्हणजे, 'नरेंद्र-भक्ति'साठी डोक्यातील 'मेंदू' नावाचं इंद्रिय' बाजुला काढून ठेवल्याचं, एक व्यवच्छेदक लक्षण होय!

या भारतानं म. गांधींच्या रुपाने 'फादर ऑफ नेशन' पाहिला आणि भ्रष्टाचार मिटवण्याच्या बाता मारणाऱ्या नरेंद्र मोदींच्या रुपाने 'इलेक्टोरल-बॉण्ड'च्या महाघोटाळ्यातून 'फादर ऑफ डोनेशन' पाहिला (तसे, नोटबंदी, PMCare फंडासारखे, इतर अनेक घोटाळे उघडकीला यायचेच अजून शिल्लक आहेत)!

दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याच्या मोदींच्या थापेबाजीवर विसंबून राहिलेल्या, बेरोजगार-अर्धरोजगार तरुणाईच्या हाती… लष्करी-सेवेत औटघटकेचे 'अग्निपथावरील अग्निवीर' बनण्याचे किंवा खाजगी क्षेत्रातील नोकरीत ''१२ तासाला १२ हजाराच्या पगाराचे'' 'कंत्राटी-गुलाम' बनण्याचे…शब्दशः पोळून काढणारे

'निखारे', मोदी-शहांच्या भाजपा-सरकारकडून ठेवण्यात आले!

…जसा, सचिन ३९व्या वर्षी निवृत्त झाला; तसे, हे काही स्वतःहून निवृत्त होऊन बीजेपीच्या 'मार्गदर्शक-मंडळा'त जाऊन बसणार नाहीत (की, आपल्या कार्यकाळात केलेल्या कुकर्मांमुळे तुरुंगात जातील?). तेव्हा, आपल्याला व आपल्या पुढील पिढ्यापिढ्यांना…बाकी सगळं तर सोडाच; पण, निव्वळ 'मोकळा श्वास' घ्यायचा असेल; तर, नरेंद्र मोदींना, या लोकसभा-निवडणुकीतून आपल्याला सक्तिने 'निवृत्त' करायलाच हवं… नव्हे, तो 'भारतीय-अध्यात्मा'त वर्णिलेला, आपला सद्यस्थितीतला 'आपद्धर्म'च होय आणि तेच, जाज्वल्य 'हिंदुत्व' होय!

…अन्यथा, या थापेबाज, फसव्या, लुटारु व निर्दयी शोषक 'गुजराथी-लॉबी'मुळे, अवघं मराठी-जगणं नासून तर जाईलच…जगण्याची 'कोंडी' केली जाऊन ते महाकर्मकठीण होऊन तर बसेलच; पण, आपल्या हलाखीच्या स्थितीबद्दल अश्रू ढाळायलाही महाराष्ट्रातला एखादा कोपरा, ही 'गुजराथी-लॉबी' आपल्यासाठी शिल्लक ठेवणार नाही!

## अनुक्रमांक ९

## रोज उठून भाषणात मु'सल'मान द्वेषाचा 'सल'…देश बुडला तरी चालेल; पण, बुडत्या देशाची सत्ता, आपल्याच हाती राखण्याकडचा नृशंस 'कल'…४ जून रोजी कोमलणार, अंतरी धर्मविद्वेषाचा 'मळ' बाळगणारं भाजपाई 'कमळ'!

मुळातून, इंडिया-आघाडीच्या विजयानंतर भाजपाच्या 'कमळ' निशाणीवर पुनश्च नव्याने जोरदार 'आक्षेप' घेतला गेलाच पाहिजे…'गायवासरु', ही काँग्रेसची निशाणी भारतीय-अध्यात्माचं प्रतिक म्हणून, जर चालू शकत नाही; तर, अध्यात्माचं उच्चतम प्रतिक असलेलं 'कमळ'…भाजपाची 'निवडणूक-निशाणी' म्हणून, कसं काय चालू शकतं?

त्यातून, ज्या घृणास्पद व संतापजनक पद्धतीने भाजपाई नेत्यांचा, मतांचं 'ध्रुवीकरण' करण्यासाठी देशात धार्मिक दंगली किंवा दंगलप्रवण वातावरण निर्माण करण्याचा, जो अश्लाघ्य प्रयत्न आटोकाट चाललेला दिसतोय…तो पहाता,

त्यांची 'कमळ' निशाणी, लवकरात लवकर कायमची बाद करायला लावलीच पाहिजे.

यांना, भारताची २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश, यात आपली सत्ता येते किंवा जाते...याने मोठा फरक पडत नाही, पण त्यांना कुठल्याही परिस्थितीत, कुठल्याही मार्गाने लोकसभा-निवडणूक जिंकायचीय... EVMची हेराफेरी करुन, निवडणूक-आयोगाला टाटाखालचं मांजर बनवून, इलेक्टोरल-बाँडचे हजारो कोटींचे घोटाळे करुन, ईडी-आयटी-सीबीआय या दमनकारी केंद्रीय यंत्रणांचा बेलगाम-बेकायदेशीर गैरवापर करुन, निवडणुकीची आदर्श-आचारसंहिता सरळ सरळ धाब्यावर बसवून धर्माच्या-धर्मप्रतिकांच्या नावावर मते मागून, देशभरात हिंदू-मुस्लिम, ओबीसी-मराठा-आदिवासी असा दंगलप्रवण जातधर्मविद्वेष पसरवून किंवा देशातील जनतेवर 'सरकारी-दहशत' बसवून... वाटेल त्या अनैतिक व बेकायदेशीर मार्गांनी का होईना; पण, त्यांना लोकसभेची निवडणूक जिंकायचीय!

...कारण उघड आहे की, देशाचं अर्थकारण, सैन्यदले, केंद्रिय निमलष्करी दले...ईडी, सीबीआय, आयटी अशा सगळ्याच दमनकारी केंद्रीय-यंत्रणा यांना केंद्रात सत्ता आणून ताब्यात ठेवायच्यात...ज्यातून, देशभरात 'सरकारी-दहशत' निर्माण करुन न्यायालयांसकट सर्वांवरच 'वचक' बसवता येतो व 'अनियंत्रित सत्ता' त्यांच्या हातात येते.

''वारांगनेव नृतनीतिरनेकरुपा'' यानुसार, रोज नवनवे 'खोटे मुखवटे' धारण करणाऱ्या 'जुमले'बाजांचं सरकार आलं की, जनतेला 'जुलूम' सहन करण्याखेरीज गत्यंतर रहात नाही, जे गेले १० वर्ष 'मोदी-शहा', या व्यापारी-जमातीच्या राजवटीत आपण पहात आलो!

खलील जिब्रान म्हणून गेलेलाच आहे, ''जिस देशका राजा 'बेपारी', उस देशकी प्रजा भिखारी!''

'मोदी-शहां'च्या बीजेपीची, गेल्या १० वर्षांची राजवट, ही एकप्रकारे भारतीयांसाठी 'इष्टापत्ती'च म्हणायची...ती या अर्थाने की, ही भाजपाई-संघीय १० वर्षांची एकाधिकारशाही, हुकूमशाही व जुलूमशाहीची रासवट राजवट एकदाची भारतीय जनतेनं अनुभवल्यानंतर... पुढल्या 'अमृतकाळा'पर्यंत, म्हणजेच २१वं शतक संपेपर्यंत तरी, भारतीय जनता...या असल्या नकली बीजेपीला जोड्याशी उभी करणार नाही... ट्रेलरच एवढा भयंकर होता, तर कोण मूर्ख पूर्ण चित्रपट पाहू धजावेल?

## अनुक्रमांक १०

मतांचं 'ध्रुवीकरण' करण्यासाठी 'आखरी रास्ता' म्हणून, ज्या घृणास्पद व संतापजनक पद्धतीने भाजपाई नेत्यांचा, प्रामुख्याने नरेंद्र मोदींचा, देशात धार्मिक दंगली किंवा दंगलप्रवण वातावरण निर्माण करण्याचा, अश्लाघ्य प्रयत्न आटोकाट चाललेला दिसतोय...तो पहाता, त्यांना 'कमळा'ऐवजी 'खंजीर' हीच निशाणी द्यायला हवी...कारण, त्यांनी २५ वर्षांचा 'दोस्तपक्ष' असलेल्या शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसला आणि आता असं घातकी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करुन 'भारतमाते'च्याच पाठीत खंजीर खुपसू पहातायत...म्हणूनच, 'खंजीर' तरी किंवा अगदी चुलीची-भट्टीची नाही; तर, निदान 'काडेपेटी'चीं तरी निशाणी, यांना 'कमळा'ऐवजी द्यायलाच हवी. काडेपेटीला साजेसे यांचे, आग लावायचेच धंदे...घराघरात, गावागावात, राज्याराज्यात, संपूर्ण देशभरात आगी लावून मजा बघत...त्या आगीवर, आपली राजकीय-पोळी भाजून घेणारे, हे विकृत 'आगलावे' आहेत म्हणूनच!

उत्तर प्रदेशानंतर, लोकसभेच्या सर्वात जास्त जागा असणाऱ्या महाराष्ट्राचा निकालच, केंद्रात कुणाची सत्ता येणार, याबाबत निर्णायक ठरणार आहे... अशा आणीबाणीच्या आणि अटीतटीच्या प्रसंगी, खंबीर उभं राहत, महाराष्ट्रातल्या उद्धव ठाकरे नावाच्या ढाण्या वाघाने दिल्लीश्वरांना आवाज दिलाय, जबरदस्त तगडं आव्हान दिलंय...आजुबाजुचे बुरुज ढासळत असताना किल्ला लढवणं, हे सोपं होतं?...नाहीतर, आजुबाजुला आपण बघतोच आहोत, ''आली रे आली भागाबाई'' तसं, ''आली रे आली रे ईडी-आयटीची नोटीस बाई'' की, यांची पळापळ व भागमभाग आणि दिल्लीश्वरांसमोर ''घालिन लोटांगण वंदीन चरण'', सुरु! ...आणि, तरीही त्या ढाण्या वाघाच्या, उद्धवजींच्या, मूळ-असली शिवसेनेलाच 'नकली' म्हणता?

'एक अकेला सब पे भारी' म्हणता म्हणता, ४०पेक्षा अधिक छोट्यामोठ्या पक्षांची NDAची मोट रचत, गुडघ्याला बाशिंग बांधून हे नुसते बसलेच नाहीत...तर, त्यानंतर, यांची एवढी खाली घसरण होत गेली की, भाजपाची गाडी (की, अंबानी-अदानीचा टेंम्पो?) थेट नवनीत राणा, कंगना राणावतपर्यंत येऊन थबकला...अरेरे, काय आणि किती रे, ही अवनती!

कंगना 'राणावत' म्हणजे काय, त्या 'नर+इंद्रा'ला 'ऐरावत' वाटला की, काय? ती 'राणावत' काय आणि ही 'राणा' काय...दोघीही भाजपाई 'शामभट्टाच्या तट्टाणी'च ना? एकीला २०१४मध्ये स्वातंत्र्य मिळाल्याचा झालेला साक्षात्कार; तर, दुसरीने मातोश्रीवर जाऊन 'हनुमान चालिसा' म्हणण्याची केलेली अपयशी नौटंकी!

'राणावत आणि राणा', या दोघींना आणि त्यांच्या बोलवित्या धन्यांना...४ जून रोजी, खऱ्याअर्थाने कळेल, जाज्वल्य-ज्वलंत 'मराठी बाणा'!

स्वतःच्या ५६'' छातीचा दावा करताय ना? विंध्याचल पर्वताच्या उत्तरेकडची वाराणसीची निवडणूक लढवताय ना; मग, खरे ५६'' छातीचे असाल...तर, विंध्याचलाच्या दक्षिणेकडची एखादी निवडणूक लढवून दाखवा, राहुल गांधींसारखी!

लढवा, आंध्रप्रदेश, केरळ किंवा तामिळनाडूमधली... तुम्हाला हवी तिथली, कुठलीही. पण, तुम्ही ती राहुल गांधींसारखी कधिही लढणार नाही, लढू शकणार नाही. कारण, तुम्ही एक नंबरचे डरपोक आहात आणि जगातला सर्वात मोठा राजकीय पक्ष स्वतःला म्हणवणारा 'भाजप'; हा फक्त, भारताच्या उत्तरेपुरता मर्यादित 'विभागीय पक्ष' आहे... नोटबंदी, इलेक्टोरल-बाँड आणि PMCare फंडातल्या आणि आपल्या खासमखास दोस्त असलेल्या बड्या गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाच्या काळ्या पैशावर बांधलेल्या भारतीय जनता पक्षाच्या राजमहालाचा, 'दक्षिणे'कडचा दरवाजा, कर्नाटक-विधानसभा निवडणुकीनंतर, तोंडावर आपटून केव्हाचाच बंद झालाय!

काश्मीरमधून ३७० कलम काढल्याचा प्रचार करत देशभर मतांची 'भीक' मागत फिरता (गेल्या १० वर्षांच्या कर्तबगारीचा, सगळा नन्नाचाच पाढा, असल्याकारणाने)... पण, काश्मीर खोऱ्यातील तीनही लोकसभा-निवडणुकीच्या मैदानातून (ज्या लोकसभेच्या जागा, ३७० कलम असतानाही, तुम्ही २०१९साली लढवल्या होत्या व सर्वच ठिकाणी दणदणीत पराभूत झाला होतात) पार्श्वभागाला पाय लावून पळ काढता आहात? कुठे गेला तुमचा तो भंपक 'राष्ट्रवाद' आणि ३७० कलम हटवल्यानंतर तुम्ही काश्मिरी-जनतेचा संपादन केलेला विश्वास??

...याविषयी, भाजपाचा 'कुप्रसिद्ध' अमित मालवीयकृत आयटी-सेल व मेंदूविक्या 'गोदी-मिडीया', तोंडात मूग गिळून गप्प का?

## अनुक्रमांक ११

## शिवसैनिकहो, तुमच्यासाठी.....

शिवसेनापक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे, 'मातोश्री'वर येणाऱ्या शिवसेनेतील नवागतांना...''आज माझ्या हाती तुम्हाला देण्यासारखं काहीही नसताना, तुम्ही माझ्याकडे आलात, हे विशेष आहे'', असं म्हणत असतात. त्यामुळे कुठेतरी, तुमच्या हृदयात निश्चितपणे गलबलून येत असणार. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात, भातशेतीसाठी 'राब' भाजायचे दिवस आहेत सध्या...म्हणूनच, तो धागा पकडून तुम्ही, मा. उद्धवजींना सांगितलं पाहिजे की, ''उद्धवजी, महाराष्ट्रभरात तुम्ही जिथे जिथे जाताय, तिथे उसळणारा हा सगळा जनसागर-जन'सैलाब', लोकसभा-निवडणुकीच्या मतपेटीतून भाजपा-NDAच्या हुकूमशाही-अत्याचारी राजवटीचा 'राब' पुरता भाजून, तुम्हाला तुमचा पूर्वीचा 'आब' परत मिळवून देईल, यावर शंभर टक्के विश्वास ठेवा!''

देशाच्या पंतप्रधानाला 'इंडिया' शब्दाची 'ॲलर्जी' आहे काय? उच्चारताना काय लाज वाटते का हो...की, 'सहन होत नाही आणि सांगता येत नाही', असला कसला 'मूळव्याधी'सारखा त्रास होतो?...इंडिया नाही म्हणत, सारखं 'इंडी इंडी' करतात...अरे, ती ईडी-आयटी-सीबीआयचा धाक दाखवून किंवा सरकारी-कंत्राटांतल्या खोक्यांचं आमिष दाखवून लाटलेली...हजारो कोटींची 'इलेक्टोरल-बॉण्ड्स'ची 'हंडी', पंतप्रधानांच्या डोक्यात एकदम 'फिट' बसलीय, म्हणूनच ते 'इंडी इंडी' करतात.

पण, नरेंद्र मोदीजी, लक्षात ठेवा, ही 'शिवसेना' आहे... तुम्ही 'इंडी इंडी' करता, पण उद्धवजींच्या शिवसेनेला, कुठल्याही निवडणुकीची 'दहीहंडी' फोडायचं चांगलंच 'कसब' आहे... असं असलं तरीही, सध्या बीजेपीला आधीपासूनच फितूर झालेल्या सरकारी वकील उज्वल निकमांमुळे 'कसाब आणि कसाब'ची बिर्याणी सध्या खूप गाजतेय... तेव्हा, उद्धवजींनी, चुकूनसुद्धा आपल्या भाषणात 'कसब' शब्द वापरता कामा नये...राहुल गांधींच्या प्रत्येक शब्दाची व शब्द-संदर्भाची मोडतोड करणारी ही डॅंबिस, भाजपाई-संघीय 'आयटी-सेल'वाली लोकं, त्यांनी 'कसब' शब्द वापरला रे वापरला की, 'कसाब'ची उद्धवजींनी आठवण काढली, म्हणून 'गोदी-मिडीया'तून, समाजमाध्यमांतून ठो ठो बोंबाबोंब करतील...स्व. बाळासाहेबांच्या हिंदुत्वाला उद्धवजींनी हरताळ फासला; म्हणून कांगावा करतील!

लक्षात घ्या, शिवसेनेसाठी लोकसभा-निवडणूक २०२४ची महाराष्ट्रातील हंडी...स्पेनच्या गोविंदाचा विक्रम मोडू पहाणारी आठ-नऊ थरांची हंडी नव्हे; तर, शिवसेनेचे एकवीस उमेदवार लोकसभा-निवडणुकीत उभे असल्याने, यावेळची 'दहीहंडी' तब्बल २१ थरांची आहे. ही 'राजकीय-हंडी', यंदा मा. उद्धव ठाकरेंची 'असली' शिवसेना... ''मिंधेंची 'नकली' शिवसेना, बारा वाजलेल्या घड्याळाची बाराच्या भावात जाऊ पहाणारी अजित पवारांची 'नकली' राष्ट्रवादी, कोमेजलेल्या कमळाची 'नकली' भाजपा (अहो, 'असली' भाजपा...अटलबिहारी

बाजपेयींची) आणि रामदास आठवलेंची RPI'' ...या चारही पक्षांना, एकाचवेळी 'चारीमुंड्या चीत' करुन फोडणार आहे!

''हंडी एकवीस थरांची,
गच्छतींच्या तयारीची...
'अच्छे दिनां'चं असह्य ओझं,
एकजुटीने झुगारण्याची...
४ जूननंतर कुकर्म्यांना,
तुरुंगात पाठवण्याची...
हंडी शिवसेनेची २१थरांची''!

...अहो, कविता काय फक्त, रामदास आठवलेंनीच करायच्या की, काय? 'र ला ट आणि ट ला र' जोडत, आम्हाला नाही करता येत कविता?

आता, 'रामदास' आपल्याला 'आठवले'...म्हणून सांगायचं की, ते बिचारे तिकीट न मिळाल्याने बसलेत हात चोळत...पण, नावातल्या 'दास' शब्दाला जागत, आजही ते नरेंद्र मोदींच्याच चरणापाशी बसून आहेत; पण, खरा चमत्कार ४ जूननंतर होईल...तुम्ही 'याचि देही, याचि डोळा', तो 'फर्स्ट डे, फर्स्ट शो' बघाच!

शिवसैनिकहो,

लक्षात ठेवा, एकनाथ शिंदे आणि अजित पवार...ही, अनुक्रमे शिवसेना व राष्ट्रवादीच्या वटवृक्षावर उगवलेली 'बांडगुळं' आहेत...त्यांचाच रस शोषून बेफाम वाढलेली 'विषवल्ली' आहे ती!

ती बांडगुळं, ती विषवल्ली... निपटायची, उपटायची; तर, 'जागते रहा, रात्र वैऱ्याची आहे'!

## अनुक्रमांक १२

काश्मीरच्या रद्द केलेल्या ३७० कलमाभोवती, बीजेपीची 'चुनावी-दुनिया' फिरत असताना... 'बीजेपी'ने, काश्मीर खोऱ्यातील लोकसभा-निवडणुकीच्या मैदानातून पार्श्वभागाला पाय लावून पळ का काढलाय? आणि, 'लडाख'ला राज्यघटनेच्या ६ व्या परिशिष्टात टाकण्याच्या आपल्याच आश्वासनाला हरताळ का फासलाय?? हीच का, ती 'मोदींची गॅरंटी'...की, विविध 'चुनावी-जुमल्यां'ची वर्षाचे बारा महिने वाजत असणारी 'भाजपाई घंटी'???

मुळात, काश्मीरच्या ३७० कलमामुळे भारत एकसंध असण्यात मोठी अडचण होती व तो भारतीय-सार्वभौमत्वाला मोठा धोका होता, हे भाजप-संघाकडून आणि 'क्षणाक्षणाला रंग बदलणाऱ्या सरड्या'पेक्षा किंवा 'नरेंद्र मोदी जेवढ्या वेगाने आपला पोशाख बदलतात'; त्याहीपेक्षा, अधिक वेगाने आपली राजकीय-भूमिका बदलणाऱ्या 'बीजेपी'च्या महाराष्ट्रातील 'सुपारीबाज' मित्रपरिवार-नेत्यांकडून, जे भासवलं जातंय... ते किती धादांत असत्य आहे, हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून सूर्यप्रकाशासारखं केव्हाचंच स्पष्ट झालंय!

सर्वोच्च न्यायालयाने ''काश्मीरचं ३७० कलम, हे भारताच्या सार्वभौमत्वाचा बिलकूल भंग करणारं वगैरे नसून; ते केवळ, 'सिमेट्रीक-फेडरॅलिझम'चं (Asymmetrical Federalism) म्हणजेच, सममिती नसलेल्या किंवा 'असममित-संघराज्यप्रणाली' असल्याचं द्योतक आहे'', असं सुस्पष्ट नमूद केलंय...म्हणजे, इथेच सगळा, यांच्या बोगस-बनावट 'राष्ट्रवादा'चा फुगा, सर्वोच्च न्यायालयाची टाचणी लागल्याने फुस्स् होऊन जातो!

मुळात, पं. नेहरु व इंदिरा गांधी यांनी, ३७० कलमातील अनेक तरतुदी राजकीय कौशल्याने टप्प्याटप्प्याने शिथिल करत आणल्या होत्याच!

...तसेच, यासंदर्भात, विशेष बाब म्हणजे, ३ ऑगस्ट-२०१५ रोजी मोदी-सरकारनेच, नागालँडच्या 'नॅशनल सोशालिस्टीक कॉन्सिल ऑफ इंडिया'शी (National Socialist Council of Nagaland...NSCN) गुप्तपणे करार (Framework Agreement) करुन 'सार्वभौमत्वात दोघांचीही भागिदारी' ("Shared Sovereignty") हे तत्त्व स्विकारलंय, ज्यानुसार नागालँडला भारतीय-संघराज्यात खास असा, 'विशेष-दर्जा' मोदी-शहा सरकारकडून दिला गेलाय...हे कितीजणांना माहित्येय?

...परिस्थितीवशात आसाम, नागालँड, हिमाचल प्रदेश, मणिपूर, मेघालया, सिक्कीम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, उत्तराखंड आणि तेलंगणा...या सर्वच राज्यांना, भारतीय-संघराज्य संरचनेत, विशिष्ट प्रमाणात 'विशेष राज्याचा दर्जा' देण्यात आलेला आहे.

काश्मीरचं ३७० कलम काढल्याची, एकमेव जमेची बाजू (बाकी, १० वर्षात सगळा नन्नाचाच पाढा) जोरकसपणे लोकसभा-निवडणुकीत प्रचारासाठी लावून धरणारी 'बीजेपी'... काश्मीर खोऱ्यातील तीनही लोकसभा-निवडणुकीच्या मैदानातून पळ का काढतेय?

कुठे गेला, यांचा तो भंपक 'राष्ट्रवाद' आणि ३७० कलम हटवल्यानंतर, कथितरित्या काश्मिरी-जनतेचा संपादन केलेला विश्वास??

...याविषयी, देशभरातले (म्हणजे, खरंतरं फक्त, उत्तर भारतातले; कारण दक्षिणेत यांचं अस्तित्व नगण्यच) सगळेच बीजेपीवाले, त्यांचा 'कुप्रसिद्ध' अमित मालवीय फेम आयटी-सेल व 'गोदी-मिडीया', तोंडात मूग गिळून गप्प का???

३७० कलम हटवण्यापश्चात, काश्मीरमधून दहशतवाद आणि भ्रष्टाचार संपणार होता...ते सारं संपलं का?

काश्मीरचं ३७० कलम हटवण्यामागचा आणि 'लडाख'ला राज्यघटनेच्या ६ व्या परिशिष्टात टाकण्याबाबत, 'सोनम वांगचुक'च्या (ज्यासाठी, या लडाखी नेता व संशोधकाने, अलिकडेच २१ दिवसांचं उपोषण केलं होतं) लडाखवासीयांची घोर फसवणूक करण्यामागचा... मुख्य हेतू, तेथे अंबानी-अदानीसारख्या मोदी-शहांच्या भांडवलदार-मित्रपरिवाराला...जमिनी-शेतजमिनी, फ्लॅट्स, रेसॉर्ट्स-हॉटेल्स-दुकानांसारखी स्थावर-मालमत्ता खरेदी करणं शक्य व्हावं, हाच नव्हे काय? 'पर्यटन-उद्योग उभारणी' वगैरेंच्या गोंडस नावाखाली, काश्मीर-लडाखसारख्या पृथ्वीवरील नंदनवनाचा निसर्ग, हवातसा वेडावाकडा ओरबाडत व तेथील पर्यावरण कायमचं प्रदूषित करत... 'गुजराथी-लॉबी'ला बक्कळ नफा कमवून देत रहाण्यासाठीच, नव्हे काय?

...म्हणजेच अंति, काश्मीर व लडाखची अवस्था, त्या महाराष्ट्रासारखी करायची...ज्याची, ''एका बाजुला 'गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गा'ची पैशाचिक-पाशवी ताकद आणि दुसऱ्या बाजुला उत्तर भारतीयांचं राक्षसी संख्याबळ'' ...अशा, कात्रीत सापडून आजमितीस भयंकर दुरवस्था झालीय. जसा महाराष्ट्रातला मूळ 'मायमराठी-माणूस देशोधडीला लागला आणि तिथलं निसर्ग-पर्यावरण कायमचं उध्वस्त झालं... तशीच, यथावकाश काश्मीरची 'काश्मिरियत' व लडाखची 'लडाखी-संस्कृती' या गुजराथी-लॉबी'ला, आपल्या 'बकासुरी' स्वार्थापोटी एकदाची उध्वस्त करुन टाकायचीय!

काश्मीरच्या 'दल-लेक'मध्ये, मोदींच्या म्हणण्यानुसार, खरंच भाजपचं 'कमळ' फुललं का...फुललं असेल; तर मग, काश्मीरची लोकसभा-निवडणूक लढायला, ते का घाबरतायत?

लडाखला राज्यघटनेच्या ६ व्या परिशिष्टात टाकण्याचं, भाजपाने २०१९च्या आपल्याच जाहीरनाम्यात ठळकपणे क्र.३ च्या, दिलेल्या आश्वासनाला *....पान क्र. १० वर*

---

जरा कल्पना करुन बघा की (कॉर्पोरेटीय परिभाषेत 'ब्रेन-स्टॉर्मिंग') दिल्लीतून 'गुजराथी-लॉबी'ची रासवट सत्ता देशावर लादणारे दोन्ही सत्ताधीश, जर कधि राजकारणात नसतेच आणि आपल्यासारख्या नोकरदारांप्रमाणेच या 'भांडवली-व्यवस्थे'तील स्पर्धात्मक-बाजारात नोकरीसाठी धडपडले असते...तर, काय घडलं असतं? त्यांची खरीखोटी अल्प शिक्षणं, एकूणच बेमालूम थापेबाज व गंडवागंडवी करणारी व्यक्तित्वं, पाशवी अहंकार व भयंकर विद्वेषीवृत्ती...या 'भांडवला'वर कुठली नोकरी यांना मिळाली असती आणि समजा, चुकूनमाकून मिळालीच ('कंत्राटी-कामगार/कर्मचारी पद्धती'तील गुलामीच पदरी पडणार) असती तर, ती काळ टिकली असती? मग, त्यांच्यापैकी कुणाचा 'मुलगा', हजारो कोटीत 'खेळ'णाऱ्या एखाद्या संस्थेत 'प्रमुख' असता; की, तिथे 'चपराशी' असता?

---

इस्रायलमधे जीव धोक्यात टाकून नोकरी करायची; म्हणजे, सर्कशीतल्या 'मृत्यूगोला'त मोटरसायकल चालवण्यासारखं! निदान, ते मोटरसायकलवाले, भरपूर बिदागी मिळते म्हणून तरी जीवावर उदार होत होते. इथे तर, तसलाही दिलासा नसताना भारतीय तरुण बेकारीमुळे, असं काही आक्रित करायला तयार होत असतील; तर, ती त्यांची असहाय्यता...ते त्यांचं 'मूक आक्रंदन' होय! तिचं परिस्थिती, अग्निवीरांची आहे...धड प्रशिक्षण, नोकरीतलं संरक्षण नसलेल्यांना 'बळीचा बकरा' म्हणून थेट सीमेवर धाडलं जातंय...एकीकडे, २३ वर्षांचे 'अग्निवीर', पुढील ४वर्षात ऐन तारुण्यात निवृत्त होऊन दिशाहीन अवस्थेत बाहेर फेकले जाणार; तर, दुसरीकडे ७३वर्षांचा 'अवघे पाऊणशे वयोमान' असलेला सत्ताधारी तरुण, तिसऱ्यांदा गुडघ्याला बाशिंग बांधून लोकसभा-निवडणुकीत उतरलाय!

---

जिंदगी के दाम गिर गये, कुछ गम नहीं; मौत की गिरती हुई कीमत से, घबराता हूँ मैं...
काही दिवसापूर्वीच हैद्राबादमधील एका तरुणाचा मृतदेह विमानाने युक्रेनच्या युद्धभूमीवरुन आला; तेव्हाच प्रथमतः, भारतीय तरुण बेरोजगारीमुळे रशियात गेल्याचे समजले. तसेच, जवळपास १०हजार भारतीय-तरुण उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणामधून युद्धग्रस्त इस्रायलमध्ये काम करण्यासाठी पाठवणे सुरु आहे...त्यापैकी, ६४ कामगारांचा पहिला जथ्था इस्रायलमधे पोहोचलादेखील! इस्रायलने गाझापट्टीत आक्रमण केल्यापासून इस्रायलमधील पॅलेस्टाईन कामगार निघून गेल्यानंतरची, ही स्थिती आहे. या प्रत्येक भारतीय तरुणाला, आपला जीव धोक्यात आहे, याची पूर्ण जाणीव आहे; पण, बेरोजगार म्हणून उपाशी मरण्यापेक्षा, कामावर असताना मरु, ही भावना आहे.

## काश्मीरचं ३७० कलम काढलं म्हणून (३७० जागांचा बीजेपीचा अवास्तव दावादेखील, त्यातूनच आलेला) भारतभरात प्रचाराची एकच राळ उडवून देणारे 'बीजेपी'चे नेते आणि बीजेपीच्या 'इलेक्टोरल–बॉण्ड'चे व अंबानी–अदानीसारख्या मोदी–मित्रांचे 'खोके' पोहोचलेले 'बीजेपी'चे नवनवे मित्र–नेते; भारतीय जनतेची या ३७० कलम प्रकरणी, कशी तद्दन दिशाभूल करतायत, ते जरा थोडक्यात पाहूया....

• मुळात, काश्मीरच्या ३७० कलमामुळे भारत एकसंध असण्यात मोठी अडचण होती व तो भारतीय–सार्वभौमत्वाला मोठा धोका होता, हे जे भाजप–संघाकडून आणि त्यांच्या, 'सरड्यापेक्षाही वेगाने रंग बदलणाऱ्या' मित्रपरिवार–नेत्यांकडून भासवलं जातंय... ते किती धादांत असत्य आहे, हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातून सूर्यप्रकाशासारखं केव्हाचंच स्पष्ट झालंय!

• सर्वोच्च न्यायालयाने काश्मीरचं ३७० कलम, हे भारताच्या सार्वभौमत्वाचा बिलकूल भंग करणारं वगैरे नसून; ते केवळ, 'सिमेट्रीक–फेडरॅलिझम'चं (Asymmetrical Federalism) म्हणजेच, सममिती नसलेल्या किंवा 'असममित–संघराज्यप्रणाली' असल्याचं द्योतक आहे, असं नमूद केलंय...म्हणजे, इथेच सगळा, यांच्या बोगस–बनावट 'राष्ट्रवादा'चा फुगा, सर्वोच्च न्यायालयाची टाचणी लागल्याने फुस्स् होऊन जातो!

• ...विशेष बाब म्हणजे, ३ ऑगस्ट–२०१५ रोजी मोदी–सरकारनेच, नागालँडच्या 'नॅशनल सोशालिस्टीक कॉन्सिल ऑफ इंडिया'शी (National Socialist Council of Nagaland...NSCN) गुप्तपणे करार (Frame-work -greement) करुन 'सार्वभौमत्वात दोघांचीही भागिदारी' ("Shared Sovereignty") हे तत्त्व स्विकारलंय, ज्यानुसार नागालँडला भारतीय–संघराज्यात खास असा 'विशेष–दर्जा' (जो काश्मीरलाही ऐतिहासिक दृष्टीकोनातून ३७० कलमाद्वारे लाभला होता) मोदी–शहा सरकारकडून दिला गेलाय...हे कितीजणांना माहित्येय?

• परिस्थितीवशात आसाम, नागालँड, हिमाचल प्रदेश, मणिपूर, मेघालया, सिक्कीम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, उत्तराखंड आणि तेलंगणा...या सर्वच राज्यांना, भारतीय–संघराज्य संरचनेत, विशिष्ट प्रमाणात 'विशेष राज्याचा दर्जा' देण्यात आलेला आहे.

• काश्मीरचं ३७० कलम काढल्याची, एकमेव जमेची बाजू (बाकी, १० वर्षात सगळा नन्नाचाच पाढा) जोरकसपणे भारतभर लोकसभा–निवडणुकीत प्रचारासाठी लावून धरणारी 'बीजेपी'... काश्मीर खोर्यातील तीनही लोकसभा–निवडणुकीच्या मैदानातून (ज्या लोकसभेच्या जागा, ३७० कलम असतानाही, त्यांनी २०१९साली लढवल्या होत्या व सर्वच ठिकाणी दणदणीत पराभूत झाले होते) पार्श्वभागाला पाय लावून पळ का काढत आहे?

कुठे गेला यांचा तो भंपक राष्ट्रवाद आणि ३७० कलम हटवल्यानंतर कथितरित्या काश्मिरी–जनतेचा संपादन केलेला विश्वास??

...याविषयी, हे सगळेच; शिवाय, यांचा 'कुप्रसिद्ध' अमित मालवीय फेम आयटी–सेल व मेंदूविक्या 'गोदी–मिडीया', तोंडात मूग गिळून गप्प का??

• ३७० कलम हटवण्यापश्चात, काश्मीरमधून दहशतवाद (तिथे, सर्रास भाजप–नेत्यांच्या आजही हत्या होतायत व कालचं पूँछमध्ये लष्करी वाहनांवर दहशतवादी हल्ला होऊन हवाईदलाचा एक जवान शहीद; तर, चार गंभीर जखमी झालेत) आणि घराणेशाहीतला तथाकथित भ्रष्टाचार संपणार होता...ते सारं संपलं का? काश्मीरच्या 'दल–लेक'मध्ये, मोदींच्या म्हणण्यानुसार, खरंच भाजपचं 'कमळ' फुललं का??

• काश्मीरचं ३७० कलम हटवण्यामागचा मुख्य हेतू, तेथे अंबानी–अदानीसारख्या मोदींच्या 'गुजराथी–भाषिक भांडवलदारवर्गा'ला... जमिनी–शेतजमिनी, फ्लॅट्स, रेसॉर्ट्स–हॉटेल्स–दुकानांसारखी स्थावर–मालमत्ता खरेदी करणं शक्य व्हावं व जसं, महाराष्ट्राचं 'मराठीपण', गुजराथी–भांडवल'शहां'च्या भयंकर दबावाखाली पूर्णतया धोक्यात आणलं गेलंय; तद्वतच, तेथे गुजराथी–भाषिक धनदांडग्यांचं वर्चस्व निर्माण व्हावं, म्हणून काश्मीरची 'काश्मिरियत' संपवणं...हाच, नव्हे काय?

• एका बाजुला 'गुजराथी–भाषिक भांडवलदारवर्गा'ची पैशाचिक–पाशवी ताकद आणि दुसऱ्या बाजुला उत्तर भारतीयांचं राक्षसी संख्याबळ... यांच्या कात्रीत सापडून मराठी–माणसांच्या हातातून, त्यांच्याच हक्काच्या महाराष्ट्राची लाल–काळी माती, ओंजळीतल्या पाण्यासारखी निसटून जात असताना आणि मराठी–मुलूखातला मराठी–माणूस, देशोधडीला लागत असताना; 'गुजराथी व उत्तर भारतीय', अशा कात्रीच्या दोन पात्यांतून महाराष्ट्रातला 'मराठी–माणूस' आणि 'मराठी–भाषा' सुखरुप बाहेर पडावी, असं वाटत नाही कुणाला?

...म्हणूनच, ''संयुक्त–महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त–महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, स्वायत्त–महाराष्ट्र'', अशी बुलंद घोषणा देत, महाराष्ट्रात ३७० कलम लागू करण्याची मागणी करायची की, काश्मीरचं ३७० कलम हटवल्याचा अज्ञानमूलक विकृत आनंद साजरा करायचा?

।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)






*रायगड जिल्ह्यातील तळोजा एमआयडीसी येथील, 'ॲफ्कोटेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड'या कंपनीच्या प्रवेशद्वारावर 'धर्मराज्य पक्ष'प्रणित मधर्मराज्य कामगार–कर्मचारी 'महासंघ' या कामगार युनियनच्या नूतन फलकाचे अनावरण, दि. २७ मे–२०२४ रोजी, महासंघाचे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर आणि महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी 'ॲफ्कोटेक्स' कंपनीतील कामगार सदस्य आणि श्री. धर्मेंद्र घरत, श्री. ज्ञानेश्वर पाटील, श्री. महेश पडवळ, श्री. रघुनाथ भोईर, श्री. रमेश पाटील, श्री. सुहास पाटील आणि श्री. संतोष भोईर आदी युनिट पदाधिकारी उपस्थित होते.*

....पान क्र. ८ वरुन

हरताळ का फासतायत? ...की, तो परदेशातला काळा पैसा देशात आणून प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रु. टाकण्याच्या व दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याच्या, भाजपाई 'चुनावी-जुमल्या'सारखाच, लडाखवासीयांची तत्कालिन विधानसभा-निवडणुकीत मतं मिळवण्यासाठीचा, एक नवा 'जुमला' होता??

...इथेच, 'मोदी-गॅरंटी'विषयी, एक अति सावधानतेची आणि धोक्याची 'घंटी', भारतीय-मतदारांच्या डोक्यात घणघणा वाजत राहिली पाहीजे!

## अनुक्रमांक १३

## शिवसैनिकहो, तुमच्यासाठी.....

मा. उद्धवजींच्या शिवसेनेला आणि शरद पवारसाहेबांच्या राष्ट्रवादीला, अगदी खालच्या पातळीवर जाऊन, 'नकली' म्हणून हिणवणाऱ्या...नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना, आता हे ठणकावून सांगण्याची वेळ आलीय की, शिवसेनेचं-राष्ट्रवादीचं नंतर पाहू...पण, ही जी तुमची बीजेपी आहे ना, तिच्याविषयी प्रथम बोलूया...जी, पूर्णतया 'नकली' बीजेपी आहे!

'काँग्रेसमुक्त-भारत' करता करता, काँग्रेससकट सगळे 'विरोधीपक्षयुक्त-बीजेपी' झालायत तुम्ही...विरोधी पक्षातले एकजात सगळे भ्रष्टाचारी नेते एकत्र करुन जमवलेली राजकीय-भट्टी, म्हणजेच तुमची 'भ्रष्टाचारी जोडो पार्टी (B.J.P.)!

'अगा जे कधि होणेची नाही' असा, ४०० पारचा बोगस नारा देत व त्याद्वारे, देशाची राज्यघटना बदलण्याचा नापाक इरादा जाहीर करत आणि बेलगाम खाजगीकरण करत, तुम्ही आरक्षण संपवू पहाताय...पण, तुमचेच मुळचे; पण, आज तुमच्यामुळे विस्थापित झालेले भाजपावाले, बेंबीच्या देठापासून ओरडत...पक्षातील पदांच्या वाटपात, निवडणुकीतील तिकीट-वाटपात 'आरक्षण' मागतायत... सत्तेच्या धुंदीत, तुम्ही तिकडे दुर्लक्ष करताय, एवढंच!

...आमचे 'बीजेपी'शी तीव्र स्वरुपाचे वैचारिक मतभेद होते, मतभेद रहातील; पण, अटलबिहारी बाजपेयींच्या नेतृत्त्वाखालची 'पार्टी विथ डिफरन्स' असलेली बीजेपी, हीच खरी 'बीजेपी' होती!

''माझं सरकार टिकवण्यासाठी एकाही खासदाराची मला भ्रष्ट मार्गाने मदत घ्यावी लागत असेल; तर, असली सत्तेची खुर्ची मी, एका क्षणात लाथाडून देईन'', ही बाजपेयींची भीमगर्जना होती आणि, यांचे बघा... निर्लज्जपणे देशभर, खोक्याबोक्यांचे काय काय काळे धंदे चाललेयत ते!

यासंदर्भात, हे सांगावचं लागेल की, वाल्याचा वाल्मिकी होण्याचे दिवस तेव्हाच संपले...जेव्हा, या भाजपाई-संघीय लोकांनी कुटुंबवत्सल, प्रेमळ, आरपार दयाळू असलेला सहिष्णू 'राम' (ज्याला, 'जय सियाराम किंवा जय सीताराम', हे मायेनं ओथंबलेलं पारंपारिक संबोधन होतं), साफ बाजुला सारुन...भुवया ताणलेला व हाती 'रामबाण' घेत धनुष्यावर प्रत्यंचा चढवणारा 'रागीट-रौद्र'... तद्दन खोटा व सीतेशिवाय एकटादुकटा, असा 'राम' दाखवायला सुरुवात केली व त्याला साजेसं 'जय श्रीराम', हे नवं उग्र संबोधन दिलं!

लक्षात घ्या, यांच्या 'प्रचारकां'ना कौटुंबिकप्रेमाचा 'संसर्ग' होऊ नये व ते सदैव एकटेपणातून खुनशी-क्रूर वृत्तीचे रहावेत, म्हणूनच त्यांना लग्न करण्यास बंदी असते किंवा केलेली लग्नं, ही लोकं मोडायला लावतात...सांगा, हे सगळे प्रघात, हे सगळं वर्णन; नेमकं कुणाच्या बाबतीत चपखल लागू पडतं?

तेव्हा, ''वाल्याचा वाल्मिकी होण्याचे दिवस संपलेत आणि वाल्मिकीचा वाल्या होण्याचे दिवस अवतरलेत!''

त्यामुळे, ''भ्रष्टाचारी तुरुंगातच जायला हवेत, अशी काही सध्या भारतात परिस्थिती नाही...ते मोदी-शहांच्या 'नकली बीजेपी'त जाऊ शकतात आणि मौजमजेत जगू शकतात!''

पूर्वी पापी लोकं, त्यांच्या पापांचा हिशोब करुन चित्रगुप्ताकरवी, नरकात पाठवली जायची; पण, त्या चित्रगुप्ताला आणि त्या यमाला 'इलेक्टोरल-बॉण्ड'चे आणि अंबानी-अदानीसारख्या मोदी-मित्रांचे 'खोके' बीजेपीकडून पोहोचायला लागल्यापासून परिस्थिती बिघडलीय...ते 'पापी', आता मरणोत्तर नरकात जाण्याऐवजी जिवंतपणीच थेट 'नकली बीजेपी'त जायला लागलेत. शिवाय, 'यम आणि चित्रगुप्ता'शी बीजेपीने, 'नकली-हिंदुत्वा'च्या माध्यमातून लावलेल्या 'सेटिंग'मुळे, मेल्यावर त्यांना नरकातून सुटण्याची हमीदेखील आहे!

हे सगळं जरी, असं अघटित असलं; तरी, आपण मात्र आपल्या हृदयीचा, आपल्या अंतःकरणीचा... न्यायी, सत्यवचनी, प्रेमळ असा खरा 'राम' स्मरायचा-जागवायचा आणि 'जय श्रीराम' असा उग्र नारा देत आलेल्या...साधूच्या नव्हे; चक्क रामाच्या वेषात आलेल्या अन्यायी, असत्यवचनी व क्रूर रावणांना अचूक ओळखायचं आणि लोकसभा-निवडणुकीच्या मतपेटीतून, त्यांच्यावर 'रामबाण' सोडून खरा 'सर्जिकल-स्ट्राईक' करायचा... धन्यवाद!

## अनुक्रमांक १४

## इंदिरेनं देशाला 'दान' दिलेलं 'मंगळसूत्र' आणि सोनियाजींनी 'बलिदानं दिलेलं 'मंगळसूत्र'....

फाळणीपूर्व दंगलींनी देश खिळखिळा झालेल्या अवस्थेतच, भारताला स्वातंत्र्य मिळालेलं...विकास-प्रक्रियेवर व पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी चीनसारख्या बलाढ्य शेजाऱ्याशी 'हिंदी-चिनी भाई भाई' करत, संबंध सौहार्दपूर्ण ठेवण्याखेरीज भारत-सरकारला गत्यंतर नव्हतंच...अशातच, चीनने पाठीत खंजीर खुपसत भारतावर १९६२मध्ये हल्ला केला! देशांतर्गत संसाधनांची मोठी वानवा होती. यास्तव, पं. जवाहरलाल नेहरुंनी आर्त स्वरात भारतीय जनतेला मदतीची हाक दिली. तेव्हा, त्यांची मुलगी 'प्रियदर्शिनी' (रवींद्रनाथ टागोरांनी दिलेली उपाधी) इंदिरा गांधी यांनी, आपले सगळेच्या सगळे जडजवाहीर, दागिनेच काय तर, आपलं 'मंगळसूत्र' देखील देशाला दान म्हणून देऊन टाकलं होतं... आपल्यापैकी कितीजणांना याची कल्पना आहे?

...आणि, राहुल-प्रियंकाच्या आईनं (सोनियाजींनी) तर, आपलं 'मंगळसूत्र'चं देशाच्या 'बलिवेदी'वर चढवलं होतं!

या भाजपाई-संघीय लोकांनी अशी किती बलिदानं देशासाठी आजवर दिलीयतं? बलिदानं देणं तर, सोडाच; पण, मोंगल असोत वा असोत ब्रिटीश... स्वातंत्र्य-चळवळीला 'अपशकून' करणारे हे, कायमचं सत्तेच्या सिंहासनाची हुजरेगिरी करत आलेत... परंपरेनं, 'स्वातंत्र्यवीरा'ऐवजी 'माफिवीर' पैदा करणाऱ्या या जमातीचं, 'बलिदान' नव्हे; तर लाचारी, खोटेपणाचा कळस, जातधर्मविद्वेष हेच यांचं 'बलस्थान' राहीलेलं आहे!

...आणि ४ जूनला, शंभर टक्के 'मावळते' ठरणारे आजचे पंतप्रधान, सत्तालालसेपोटी वाटेल त्या थराला जात... ''म्हणे, मुसलमानांची घरं भरण्यासाठी केंद्रात सत्तेवर येताच, देशातील गोरगरीब हिंदू भगिनींच्या गळ्यातलं 'मंगळसूत्र', काँग्रेस हिसकावून घेणार असल्याचा हिणकस कांगावा करतायत''.

यांच्याच म्हणण्यानुसार, ''या अमृतकाळात अस्मानातून 'सप्तर्षी' म्हणे, यांना पथदर्शन करताहेत''... धर्माचं ध्रुवीकरण आणि जातीयवादाचं समीकरण'' मांडणारं, असलं हिणकस मार्गदर्शन, अखिल जगताच्या कल्याणाची धुरा वहाणारे, ते सप्तर्षी कधि करतील?

...दांभिकता-असत्यकथन, पाताळयंत्री कारभार आणि जनसामान्यांची 'जातधर्मा'च्या नावावर चाललेली सततची फसवणूक व अतोनात शोषण, निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंस करणाऱ्यांनो, ...कशाला, ऋषिमुनींच्या, शिवबा-संतांच्या महन्मंगल हिंदुधर्माला बदनाम करता??

...तेव्हा, असा, अगदी खालच्या पातळीचा माणूस, पंतप्रधान म्हणून गेली १० वर्ष, देशाची फसवणूक करत देशाच्या उरावर बसलाय, हे देशाचं केवळ दुर्भाग्यच नव्हे; तर, फार मोठं वैचारिक दारिद्र्यही आहे!

''कधि कधि आपलंच रक्त,
आपल्याला फसवतं...
आणि रामाच्या पोटी,
एखादा रावण प्रसवतं!''

या परमपावन भरतभूमीनं आपल्याला चकवलंय आणि तिच्या मुशीतून 'अपघात' म्हणून ही रावणाची पिलावळ तिनं प्रसवलीय!

फरक इतकाच आहे की, ''रामायणात रावण, सीतेचं अपहरण करण्यासाठी 'साधू'चा वेष परिधान करुन आला होता...लोकसभा-निवडणूक-२०२४मध्ये तो, 'लोकशाही'रुपी सीतेचं अपहरण करण्यासाठी, बेमालूम 'रामा'चाच वेष परिधान करुन आलाय''!

ही त्यांची वेषांतर, हे त्यांचं सोंगढोंगं... आपण अचूक ओळखून, देशाचं 'तिसरं स्वातंत्र्ययुद्ध' बनलेल्या या निवडणुकीत... 'श्री राम' म्हणणाऱ्या बनावट हिंदुत्ववाद्यांना, ४ जून रोजी उघडणाऱ्या मतपेटीच्या मर्माघातातून 'हे राम' म्हणायला लावायचंच!

## अनुक्रमांक १५

''शब्द घासून घ्यावा, शब्द मापून घ्यावा, शब्द तोलून घ्यावा आणि मगच बोलावा...पाणी, वाणी आणि नाणी कधि नासू नये'', असं सांगणारे 'जगद्गुरु' संत तुकाराम कुठे आणि याच्या विपरीत व्यवहार करणारे, अंधभक्तांनी बनवलेले बनावट 'विश्वगुरु' नरेंद्र मोदी कुठे?

ज्याला, 'Mythomania' नावाचा मानसिक-रोग जडला; तो कधि खरं बोलूच शकत नाही...जणू, खोटं बोलण्याची सवय, त्याच्या हाडामांसातच भिनलेली रहाते. आपल्या पंतप्रधानांचं आणि ते ज्या राजकीय-संप्रदायातून येतात, त्या सर्वांनाच हा मानसिक-रोग जडल्यासारखं दिसतं. त्या रोगाची पुढील अधोगती म्हणजे कपोलकल्पित, पण अगदी सुरस कथानकं रचणं आणि त्याद्वारे भोळसट-अज्ञानी लोकांच्या मेंदुचा ताबा घेणं.

भाजपाई-संघीय नेतृत्त्वाच्या बाबतीत ही गोष्ट इथेच थांबत नाही; तर, अगदी उच्चशिक्षितवर्गाच्याही मेंदुचा, ते रितसर ताबा घेतात आणि त्या तथाकथित बुद्धिजिवीवर्गाची सारासार विचार करणारी विवेकबुद्धीच नष्ट करताना दिसतात...त्यामुळेच, अज्ञानी अंधभक्तुल्यांकडे पाहिलं

की, शिक्षणाचं अपरंपार महत्त्व जाणवतं; पण, अगदी मोठे वकील, आयआयटी, आयआयएम, एमडी-एमएस, चार्टर्ड अकाऊंटंट वगैरे अत्युच्चशिक्षित मंडळी देखील, या 'काळ्या टोपीवाल्यांच्या काळ्या प्रभावाखाली' आलेली पाहिली की, शिक्षण अगदी व्यर्थ वाटायला लागतं!

...इस्रोसारख्या संस्थेतले शास्त्रज्ञ, मोठमोठी कॉर्पोरेटीय व्यवस्थापक मंडळी, मायक्रोसॉफ्टचा सत्या नडेला, गुगलचा सुंदर पिचाई, भारतातल्या अनेक कंपन्यांचे CEO...हे सारे, जणू यांचे इमानदार नोकर किंवा कट्टर कार्यकर्ते असल्यासारखे वागताना दिसतात, या दुर्दैवाला म्हणावं तरी काय?

...''सतत रेटून खोटं बोलायचं; म्हणजे, जनतेला ते वारंवार सांगितलं गेलेलं 'असत्यच, सत्य' वाटायला लागतं'', हे 'गोबेल्स-तंत्र' ज्यांच्याकडून यांनी, अगदी घोटून घेत शिकलेलं आहे...तो जर्मनीचा नृशंस हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर, दुसऱ्या जागतिक महायुद्धापूर्वी...याच पद्धतीने, सर्वच थरातल्या जर्मन्सच्या मेंदुंचा कौशल्याने ताबा घेऊन बसला होता. मोजके बडे भांडवलदार हाताशी धरुन, सर्वच प्रसारणसंस्थांवर त्याने पूर्ण ताबा मिळवल्याने 'सत्य' जनतेपर्यंत पोहोचणंच अशक्यप्राय बनलं होतं (भारतात सध्या काय वेगळी परिस्थिती आहे?) व हिटलरी खोटा प्रचारच, जर्मन जनता अखेरपर्यंत खरा धरुन चालली होती...ते अगदी इतक्या थराला गेलं की, जर्मनीचा पूर्ण पाडाव व सर्वनाश झाल्यापश्चात हिटलरने आपल्या पिस्तुलातून गोळ्या झाडून आत्महत्या केल्यावरदेखील, जर्मन जनतेला तो काहीतरी चमत्कार करणार आणि अखेरीस जर्मनी जिंकणार, असंच वाटत राहीलं होतं.

...ज्यूंच्या विरोधात हाकाटी देत लोकशाही-प्रक्रियेतूनच हिटलर निवडून आला. पण, नंतर हळूहळू आपली वाघनखं बाहेर काढत...निवडणूक-प्रक्रियेतच त्याने प्रचंड हेराफेरी केली.

पहिल्या महायुद्धातील जर्मनीचा दारुण पराभव व व्हर्सायच्या अपमानास्पद कराराने, मनोमन कमालीच्या दुखावलेल्या सर्वसामान्य जर्मन नागरिकांसमोर, हिटलरने अल्पसंख्य ज्यू नागरिक, हेच जर्मन देशाच्या अवनत अवस्थेला जबाबदार असल्याचं भासवत, त्यांना देशाचा एक नंबरचा शत्रू बनवला व त्यांचा मतदानाचा हक्क काढून घेतला. पुढे इतर सर्वच विरोधकांना सर्रास तुरुंगात डांबून, ठार करुन... यथावकाश, हिटलर निरंकुश हुकूमशहा बनला. 'युद्धसामग्री बनवणाऱ्या कारखान्यांचं उत्पादन (War Economy) हिटलरच्या काळात जोरकसपणे वाढल्याने, इतर युरोपियन राष्ट्रांच्या तुलनेत जर्मनी १९२९-३०च्या जागतिक-आर्थिकमंदीतून तुलनेनं लवकर बाहेर आला व त्याचं सर्वसाधारण जर्मन्सच्या मनावर एक गारुडंच तयार झालं.

त्यामुळेच, जर्मनीतले उच्चशिक्षित शिक्षक-प्राध्यापक, इंजिनिअर्स, डॉक्टर्स, वकील...हे सारेच, संमोहन झाल्यागत हिटलरच्या नादी लागले. लाखो ज्यूंचा रक्तपात व हत्याकांड घडवण्याच्या, त्याच्या महापातकांमध्ये हिरीरीने सहभागी झाले!

दुसऱ्या महायुद्धात हिटलरमुळे जर्मनी बेचिराख झाली, उध्वस्त झाली...कारण, तिथल्या राजकारणीवर्गात, सरकारी-दहशतीपुढे माना टाकणारे एकनाथ शिंदे, अजित पवार, राज ठाकरे, नारायण राणे वगैरे मुबलक नेतेमंडळी होती...पण, जर्मनीमध्ये नव्हते उद्धव ठाकरे, नव्हते अरविंद केजरीवाल आणि हो, मुख्य म्हणजे नव्हते राहुल गांधी!

तेव्हा, भारताचा हिटलरकालिन जर्मनी किंवा आजचा रशिया-चीन-उ. कोरिया होऊ द्यायचा नसेल; तर, 'इंडिया-आघाडी'ला या लोकसभा-निवडणुकीत घवघवीत यश मिळवून द्यावं लागेल...हे भारतीय जनतेनं मनोमन जाणलंय आणि तिला हे ही उमगलंय की, भाजपला मत, म्हणजे स्वतःच्या हाताने स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारुन घेणं किंवा स्वतःच्या हाताने स्वतःचा मृत्यूलेख (Death Warrant) लिहिणं होय!

## अनुक्रमांक १६

स्वतःच्या १० वर्षांच्या राजवटीबद्दल तोंडून ब्र काढायचा नाही; उलटपक्षी, वादळ आल्यावर वाळूत चोच खुपसून बसणाऱ्या शहामृगासारखं, मागील ७० वर्षांच्याच नव्हे; तर, ७०० वर्षांच्या इतिहासाच्या वाळूत तोंड खुपसून बसायचं आणि एखाद्या कुडमुड्या ज्योतिषासारखं पुढील २५-५० नव्हे; तर, हजार वर्षांचं भविष्यकथन करायचं...जणू हनुमान, परशुराम, बिभीषण, अश्वत्थामा, कृपाचार्य वगैरेंसारखे हे गृहस्थ, 'आठवे चिरंजीव'च!

लोकशाही, ही अगदी 'आदर्श' अशी व्यवस्था नसली... तरीही, हुकूमशाही-लष्करशाहीसारखी जुलमी-निर्दयी व कमालीची शोषक व्यवस्था नक्कीच नव्हे! अगदी कल्पनातीत अशी, भाजपाई मोदी-शहा सरकारची आजची 'जुलूमशाही' पाहताना, आपल्याला हे वाटल्यावाचून रहात नाही की, यापेक्षा ब्रिटीश-राजवट काय वाईट होती? कशासाठी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, मंगल पांडे, अशफाक उल्ला खान, शिरीषकुमार, बाबू गेनू यासारख्या आपल्या शेकडो स्वातंत्र्यवीरांनी आपले प्राण गमावले...लो. टिळक, म. गांधी, पं. नेहरु वगैरे कशासाठी वर्षानुवर्ष ब्रिटीश तुरुंगातून खितपत पडले होते??

या भाजपाई-संघीय मनोवृत्तीच्या लोकांना, इतर कोणी नव्हे; पण, म. गांधी, म्हणूनच कायम शत्रू नं. १ वाटत आला; कारण, तो महात्मा, मुळातूनच गदगदा हलवून लोकांना जागं करत होता...लोकशाहीची सवय नसलेल्या आपल्या देशात, लोकशाहीचा 'जागर' निर्माण करत होता! म. गांधी नसते तर, अजून आपण 'गुलामी'तच खितपत पडलो असतो.

...आणि, हे डँबिस लोकं काय म्हणतात; तर, म्हणे म. गांधींच्या अहिंसेमुळेच आपल्याला स्वातंत्र्य ३०-३५ वर्ष उशिरा मिळालं...अरे, वर्ष उलटी मोजा आणि मग बघा, यांना कोणी अडवलं होतं ते...करायची होती वि. दा. सावरकरांच्या नेतृत्त्वाखाली हवी तेवढी हिंसा आणि मिळवून द्यायचं होतं, देशाला लवकरात लवकर स्वातंत्र्य...उगीच आपलं काहीही बडबडायचं! स्वातंत्र्य-चळवळीत यांचा काडीमात्र सहभाग नाही...१९४२च्या 'भारत छोडो' (Quit India Movement) आंदोलनालाही यांनी अपशकून केलेला, हा जिताजागता इतिहास आहे.

सध्याचं वर्तमान पहायचं तर, सीताराम केसरींच्या १९९४-९५ जमान्यातील आयकर-भरणा करण्यातल्या काँग्रेसच्या किरकोळ तांत्रिक त्रुटी दाखवत, आयकरखात्याकडून (अर्थातच, मोदी-शहांच्या इशाऱ्यावरच) दिडशे पट दंड आकारलाय...याच गतीने, हे म. गांधी, वल्लभभाई पटेलांनी जमनालाल बजाज यांच्यासारख्या धनवानांकडून घेतलेल्या देणग्यांमध्येदेखील काही अनियमितता दाखवून, अव्वाच्या सव्वा दंड आकारायला कमी करणार नाहीत. उद्या 'इंडिया-आघाडी' सत्तेवर आली; आणि समजा, अगदी सूड उगवायचा म्हणून बीजेपीच्या संदर्भात, असा काही हिशोबातल्या खूप जुन्या त्रुटी दाखवण्याचा खेळ, काँग्रेस कधि करु शकेल? तसं करुच शकणार नाही...कारण, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल यांच्यासारखी आभाळाएवढी मोठी माणसं, जेव्हा ब्रिटीशांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध लढत होती...तेव्हा हिंदूमहासभेचे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते व पाठीराखे ('भाजपा'चे पूर्वसुरी) शेपूट घालून बसले होते; मग, स्वातंत्र्ययुद्ध लढण्यासाठी निधी उभारण्याचा व त्याचा हिशोब राखण्याचा प्रश्नच कुठे उद्भवतो? उलट, यांचे माफिवीर, ब्रिटीशांपुढे शरणागत होत, त्यांच्यापुढे लाळ घोळत होते... जिल्हाधिकाऱ्याच्या वेतनाहून अधिक भरभक्कम निवृत्तीवेतन (Pension) मिळवत होते.

...आणि म्हणे, ५०० वर्षांची राममंदिर बांधण्याची भारतीय जनतेची आम्ही मनोकामना पूर्ण केली...५०० वर्ष सोडाच, १०० वर्षांपूर्वी तरी तुम्ही कुठे होतात? तुमचे पूर्वज, तुमचे पूर्वसुरी गेल्या १०० वर्षांत, कधि स्वातंत्र्य-चळवळीत-स्वातंत्र्य युद्धात भाग घेताना दिसले नाहीत ते? थापाडे बाता करतायत...५०० वर्षांच्या!

तेव्हा, लोकसभा-निवडणुकीच्या मतपेटीतून 'इंडिया-आघाडी'ला सत्तेवर आणण्यासाठी, एकच आवाज उठवा आणि येऊ घातलेल्या 'गुलामगिरी'ला वेळीच ठोकरा....

''ये ख़ामोश मिज़ाजी तुम्हें जीने नहीं देगी...
इस दौर में जीना हैं, तो कोहराम मचा दो!''

## अनुक्रमांक १७

भारतीय-अध्यात्मानुसार ''राजाकडे द्रव्य नसलं, अन्नधान्य नसलं, अगदी सैन्य नसलं तरी चालेल; पण, त्याच्याकडे 'विश्वास', हा असलाच पाहिजे''...त्यातून सगळंच पुन्हा उभारता येईल; पण, जर विश्वासच नसेल तर उपयोग काय?

...दिल्लीश्वर, हे उद्योगपती 'अदानी'चे मित्र असलेले 'अडाणी' सत्ताधीश आहेत, सतत खोटं बोलणारी माणसं आहेत ही; ज्यांच्याविषयी, दिल्लीत असं म्हटलं जातं की, ''ऐसा कोई 'सगा' नहीं...जिनको इन्होंने 'ठगा' नहीं!''

आग, पाणी, देशातला कायदा आणि निवडणुकीच्या वेळेस देशातली जनता...यापासून सांभाळून रहायला हवं, हे बहुधा हे सत्ताधीश, सत्तेच्या नशेत विसरुन गेलेत!

तुमचं मंगळसूत्र, सोनंनाणं, गोठ्यातील म्हशी म्हणे, काँग्रेस हिसकावून घेणार आहे आणि म्हणे, राजीव गांधींना इंदिरा गांधींची सगळी संपत्ती वारसा-हक्काने हडप करायची होती, म्हणूनच त्यांनी 'वारसा-हक्क' कायदा रद्द केला...यांच्या जीभेला काही हाड? कशीही वळवळते, कितीही खोट बोलते.

देशाच्या संपत्तीवर मुसलमानांचा 'पहिला अधिकार' आहे, असं मनमोहनसिंग किंवा राहुल गांधी...कधि चुकून तरी बोललेत? पण, नरेंद्र मोदी-अमित शहा सरकारने मात्र, देशाच्या संपत्तीवर 'अंबानी-अदानी', या दोन गुजराथ्यांचा 'पहिला हक्क' असल्याचं, आपल्या कृतिने आजवर दाखवून दिलंय...बाकी, ८० कोटी भारतीय 'दरिद्री-नारायणां'ना दरमहा ५ किलो मोफत धान्याची भीक!

तेव्हा, नवतरुणाईला हे गर्जून सांगायला हवं,

''सुनो, मेरे बेरोजगार नौजवानों...
भँवर जब भी डुबोएगा,
उभार देकर मारेगा...

मोदी-शहा NDA सरकार,
तुमको ५ किलो राशन देकर मारेगा!''

तुम्हाला, मोदींचा ट्रेनच्या गर्दीतला किस्सा आठवतो? बसायला जागा मिळावी म्हणून त्यांनी अजमावलेला, तो भविष्य-कथनाचा किस्सा...खरंतरं, त्यांच्या थापेबाज, बनेल, हातोहात टोपी घालण्याच्या स्वभावाचं मूर्तिमंत दिग्दर्शन करणारा असला...तरी, तो ही खोटा निपजावा? एका पत्रकार-लेखकाच्या पुस्तकात वर्णिलेला किस्साच, जसाच्या तसा, नरेंद्र मोदींनी 'उचलेगिरी' करत आपल्याला सांगितलाय, हे नुकतंच उघड झालंय...म्हणजे, त्यातही खोटेपणाच?

दुसरीकडे, यांच्या 'अनर्थकारणा'मुळे देशात भयानक आर्थिक-विषमता धुमाकूळ घालतेय... देशातल्या २१ अब्जाधीशांकडे (Blood Billioners) ७० कोटी लोकांकडे आहे, तेवढी संपत्ती आहे. सोबतच बेरोजगार-अर्धरोजगारी, महागाईचा देशात कहर माजलाय.

फसव्या 'गुजरात-मॉडेल'वाल्या गुजराथमध्ये मकरसंक्रांतीचे पतंग हवेत उडवले जात असतानाच, देशाच्या अर्थसंकल्पाच्या वेळेस अनेक आश्वासनांचे, जुमल्यांचे पतंग गेल्या १० वर्षांत उडवले गेले....

''पैसा झाडाला लागत नाही किंवा एखादा भोंदू साधू हवेतून हात फिरवून हातचलाखीने निर्माण करतो'', तसा निर्माण होत नाही...मग, अचानक भाजपा सरकारच्या काळात लाखो कोटी रुपयांचे उड्डाणपूल, रस्ते-महामार्ग वगैरे पायभूत-प्रकल्प (Infrastructure Projects) प्रकल्प आलेच कसे....तर,

१) प्रथम म्हणजे, ७० वर्षांची नेहरु-इंदिरा गांधींच्या काँग्रेस-सरकारांनी सार्वजनिक-उद्योग व संस्था उभारुन केलेली कमाई, बेदरकारपणे मोदींच्या मित्रांमध्ये स्वस्तात वाटून टाकत, जो पैसा उभारण्यात आला त्यातून....

२) आणि, बेसुमार व अगदी ५० वर्षांच्या अतिप्रदीर्घ मुदतीची कर्ज काढून (जे ७० वर्षांत, काँग्रेस-सरकारने कधिही केलं नाही), ज्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाच्या डोक्यावर आजमितीस जवळपास दिड लाखाचं कर्ज आहे...ज्याबाबत, अगदी IMF सुद्धा गंभीर इशारा देतेय

३) काँग्रेसच्या ७०वर्षाच्या काळात एकूण ५५ लाख कोटींचं कर्ज काढलं होतं...तर, यांच्या सात पटीने कमी म्हणजे केवळ, १० वर्षांच्या भाजपा-सरकारच्या काळात २१० लाख कोटींचं कर्ज देशाच्या डोक्यावर झालंय

४) शिवाय, या प्रकल्पांतून 'चारों उंगली घी में' अशी भाजपा-सरकार व राजकारण्यांची चंगळ झालेली...प्रकल्प-उभारणीतून तत्काळ मिळणारी टक्केवारी व टोल-वसुलीची मोठी कमाई आणि वरुन भरभक्कम मतांची बेगमी...असं, हे भाजपाई-समीकरण आहे

अभिजनवर्गातील प्रतिवर्षे सरासरी दिड लाख लोकं २०१४ पासून भारताचं नागरिकत्व सोडून परदेशी कायमचे निघून गेलेत...हे कशाचं लक्षण?

नुकतचं ऑस्ट्रेलियन सरकारच्या Department of Foreign Affairs and Trade (DFAT) ने जारी केलेल्या निर्देशानुसार ऑस्ट्रेलियातल्या अभिजनवर्गाला (Big Politicians, VVIPs, Big Businessmen etc.) भारतात दौऱ्यावर जाताना आपला नेहमीच्या वापराचा फोन (अँड्रॉईड किंवा पल वगैरे) घेऊन न जाता; साधा फोन (ज्याला, Burner Phone म्हणतात व जो 'Use Throw' असतो) घेऊन जाण्याचे निर्देश दिलेत; जे सर्वसाधारणपणे, चीन, रशिया, हाँगकाँगसारख्या ठिकाणी जाताना दिले जातात...हे कशाचं द्योतक आहे?

...म्हणजेच, केवळ देशाच्या रुपयाची व देशाच्या अर्थव्यवस्थेचीच प्रचंड घसरण होतेय, असं नव्हे; तर, देश-विदेशात आजवरच्या भारतीय-प्रतिष्ठेचीही झपाट्याने घसरण होतेय...या सगळ्याच घसरणीला लगाम घालायचा; तर, 'इंडिया-आघाडी'ला लोकसभा-निवडणुकीत प्रचंड बहुमताने



निवडून द्यावं लागेल...जय हो!

## अनुक्रमांक १८

(या १८व्या लोकसभेची निवडणूक, १८ आकड्यासारखीच 'लोकविलक्षण' आहे...भारतीय-अध्यात्मात १८ या आकड्याला विशेष महत्त्व आहे...१८ पुराणं, गीतेचे १८ अध्याय, १८ दिवस चाललेलं महाभारत युद्ध आणि वेदकालीन १८ गणराज्यं इ. ...आपलंही गणराज्य (लोकशाही) सुरक्षित रहावं, यासाठी ही 'स्वातंत्र्याची तिसरी लढाई' आपण लढतो आहोत...त्याकामी, हा जो लेखनप्रपंच हाती घेतला होता, तो ही या १८ तारखेच्या १८व्या लेखासोबतच जड अंतःकरणाने 'समाप्त' करतोय...वाचकांनी, या लेखमालिकेचं मनापासून स्वागत केलं, तिला कौतुकाने उचलून धरलं, याबद्दल सर्वांचे नितांत आभार!)

**एका म्हातारीची गोष्ट....**

''झोपडीत राहणारी एक म्हातारी होती. आजीबाई खूप गरीब होती; पण, गावाला तिचा खूप आधार होता. कुणी आजारी पडलं, कुणी बाळंतीण अडलीनडली, कुणाची भांडणंतंटणं झाली, गावावर कुठलं पावसापाण्याचं-रोगराईचं नैसर्गिक-संकट आलं किंवा एखाद्या लहरी राजाची अवकृपा की, म्हातारी सगळ्यांच्या मदतीला धावून जाई. त्यामुळे, सगळेच तिचा मान राखीत, तिचं शुभं चिंतीत आणि तिच्या उदंड आयुष्यासाठी देवाकडे मनोभावे प्रार्थना करीत.

तिच्या झोपडीबाहेर एक अजब असं आंब्याचं झाड होतं, ज्याला वर्षभर आंबे लागायचे. त्या झाडाचे आंबे विकून ती आपलं पोट भरत असे. परंतु, ती थकल्यावर, तिच्या गावातलीच टगी पोरं, तिचे आंबे चोरायला लागली आणि तिला आपलं पोट भरणंदेखील मुश्किल होऊन बसलं...पण, त्या स्वाभिमानी वृद्धेनं कोणाकडे मदतीची याचना केली नाही.

...अशातच एके दिवशी एक तरुण तपस्वी साधू तिच्या झोपडीत आला आणि म्हणाला, ''हे माते, मी खूप भुकेला आहे, मला काहीतरी खायला दे''.

म्हातारी म्हणाली, ''बाबा, मी गरीब आहे रे...माझ्याकडे एकच भाकरी आहे; पण, त्यातली अर्धी तुला भुकेल्याला देते.'' साधूने अर्धी भाकरी खाल्ली, पाणी प्यायला आणि तिला म्हणाला. ''माते, तू गरीब असलीस, तरी मनाने खूप श्रीमंत आहेस...तुला खरी माणुसकी आहे. तू अर्धी भाकर दिलीस, मी प्रसन्न झालो...तेव्हा, तू आता तुला हवा तो, कोणताही वर माग!''

म्हातारी म्हणाली, ''मला असा वर दे की, माझे आंबे चोरायला कुणी आलं की, झाडाला हात लावताच ते झाडाला चिकटून बसले पाहिजेत आणि मी आज्ञा केल्याशिवाय, त्यांची बिलकूल सुटका होता कामा नये.''

साधू म्हणाला 'तथास्तु!'

दुसऱ्या दिवशी, तिला सकाळी सकाळीच गावातली आठदहा पोरं आंब्याच्या झाडाला चिकटलेली दिसली. सर्व भितीने गलितगात्र होऊन आकांत करत होती, त्या वृद्ध स्त्रीकडे गयावया करत होती.

''पुन्हा म्हणून आंब्याच्या झाडाकडे फिरकणार नाही, आंब्यांना हात लावणार नाही'', असं त्यांनी कबूल केल्यावरच, तिने त्यांना सोडून दिले.

''आणखी काही वर्षे गेली...ती वृद्धा वयोमानानुसार थकली, आजारी पडली...तिच्या मृत्यूची वेळ हळूहळू जवळ येत चालली आणि यथासमयी, तिला न्यायला यमराज रेड्यावर बसून आले. तशी ती यमराजाला म्हणाली, ''मला आणखी काही वर्षे जगू दे रे...या पंचक्रोशीतल्या साध्याभोळ्या लोकांना, खरंच माझी खूप खूप गरज आहे रे!''

यमराज म्हणाले, ''नाही, ते शक्य नाही, तुला मला न्यावीच लागेल. तुझ्या आयुष्याची घडी भरत आलीय...जेमतेम तुझ्या हातात शेवटची पंधरा मिनिटं शिल्लक आहेत...तेव्हा, तेवढ्यात काय उरकायचंय ते उरक, काय बोलायचं ते बोल.''

...म्हातारी म्हणाली, ''बरं बाबा, ऐक माझं...माझ्या झोपडीच्या बाहेर एक आंब्याचं झाड आहे. मरण्यापूर्वी त्याचा एक आंबा मला खावासा वाटतोय रे, देशील तेवढा आणून, यमराजा?''

हो, म्हणत...आंबा आणायला, यमराज स्वतः झाडाजवळ गेले. झाडाला स्पर्श केल्याबरोबर यमराज झाडाला चिकटले, कितीही प्रयत्न करुन सुटका होईना; मग, याचना करु लागले, ''माते, मला सोडव''...

म्हातारी म्हणाली, ''एका अटीवर सोडवीन... ज्यादिवशी, या गावातील सगळ्या जनतेलाच मी नकोशी होईन, त्याच वेळेस मी मरेन; अशी मला 'लोकेच्छामरणी' कर, तरच तुला सोडवेन.''

यमराज म्हणाले. ''तथास्तु!''

...त्यामुळे, ती आज पाऊणशे वयोमानाची म्हातारी, अजूनही छान जिवंत आहे...धडधाकट, टुकटुकीत, हिंडतीफिरती आहे. लोकांची सेवासुश्रूषा करतेय, त्यांचं निर्दयी राज्यकर्त्यांपासून डोळ्यात तेल घालून संरक्षण करतेय!

....विशेष म्हणजे, तिला मिळालेल्या 'लोकेच्छा-मरणी' वरामुळे, ती तोवर मरणार नाही, जोवर लोकं तिच्या जगण्याची प्रबळ 'वांछा' उराशी घट्ट धरुन आहेत... तिचं नाव आहे, 'भारतीय लोकशाही'!

ती आपली 'वांछा', आत्ता आणि इथेच, लोकसभा-निवडणुकीत 'इंडिया-आघाडी'ला मतदान करुन व्यवहारात उतरवायचीय; तर, आणि तरच, 'रामा'चा वेष परिधान करुन जो भाजपा-NDAरुपी 'यमराज', भारतीय-लोकशाहीला 'यमसदनी' न्यायला आलाय, त्याला त्याच्याच 'यमसदनी' परत धाडता येईल... 'भारतीय लोकशाही' नावाच्या ७५ वर्षे वयाच्या 'लोकेच्छामरणी' वृद्धेला, महाभारतातल्या 'मत्स्यगंधे'सारखं नवचैतन्य आणि 'चिरतारुण्य' बहाल करता येईल...धन्यवाद!''

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष) (समाप्त)

('संसदमार्ग-लोकशाहीचा राजमार्ग', या बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्या पुस्तकातील गोष्टीत, मतदार-प्रभावासाठी महत्त्वपूर्ण व सुयोग्य बदल करुन 'धर्मराज्य पक्षा'तर्फे सादर....)

# भारताचे पहिलेवहिले व अत्यंत लाडके पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु...

## यांच्या, २८ मे-२०२४, या ६०व्या स्मृतिदिनानिमित्ताने...


ज्यांनी, आधुनिक-भारताचा व जागतिक-शांततेचा भरभक्कम पाया घातला, असे भारताचे पहिलेवहिले व अत्यंत लाडके पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु... यांच्या, २८ मे-२०२४, या ६०व्या स्मृतिदिनानिमित्ताने...१८व्या लोकसभा-निवडणुकीद्वारे, भारत, तिसरं स्वातंत्र्ययुद्ध लढत असतानाच, जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असण्याच्या परिस्थितीचा... थोडक्यात घेतलेला आढावा....

**युक्रेनने पाश्चात्य देशांची युद्धसामग्री रशिया-युक्रेन युद्धात प्रत्यक्ष रशियावरच प्रतिहल्ला करण्यासाठी वापरण्यावरुन सध्या युरोपियन-युनियनमधल्या देशांमध्येच दोन तट पडलेले दिसतायत...असं घडल्यास, त्याची परिणती, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनीसारख्या देशांवर रशियाकडून हल्ला होण्यात होईल व स्वाभाविकच, तिसरं महायुद्ध पेटून आण्विक अस्त्रशस्त्रांचा वापर होण्याची शक्यता बळावेल.**

या सर्व युद्धजन्य परिस्थितीला केवळ, रशिया-युक्रेन युद्धाचीच नव्हे; तर, इस्रायल विरुद्ध हमास-हिजबुल्ला युद्धाची देखील रक्तरंजित किनार आहे.

ICC (International Criminal Court) या 'व्यक्तिगत स्तरा'वरील युद्ध-गुन्हेगारी खटले चालवणाऱ्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने, गाझापट्टीतील नरसंहारासाठी जबाबदार धरुन, इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू व संरक्षण मंत्र्यांविरुद्ध; तसेच, ७ ऑक्टोबर-२०२३ रोजी इस्रायलमध्ये घडवलेलं नृशंस हत्याकांड व निरपराध नागरिकांना ओलिस धरणे व त्यांना क्रूरपणे वागवणे, महिलांवर बलात्कार करणे वगैरे संदर्भात, हमासच्या उच्चाधिकाऱ्यांविरुद्ध अटक-वॉरंट जारी करण्याचे प्रयत्न चालवलेत. रशिया-युक्रेन युद्धातील माणुसकीला काळिमा फासणाऱ्या युद्ध-गुन्ह्यांबाबत, १७ मार्च-२०२३ रोजी रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन, यांच्याही विरुद्ध 'ICC'ने अटक-वॉरंट जारी केलेले, आपणास स्मरत असेलच!

...तर, दुसरीकडे, ICJ ने (International Court of Justice, जे न्यायालय ICCप्रमाणे 'व्यक्तिगत' नव्हे, तर देशपातळीवरील खटले चालवते) दक्षिण आफ्रिकेने दाखल केलेल्या दाव्यात, इस्रायल देशाला गाझापट्टीत वांशिक-हत्याकांड घडवण्याबद्दल जबाबदार धरले आहे. तरीही, इस्रायल ना ICC, ना ICJ, ना युनो, ना कोणा मोठ्या राष्ट्रप्रमुखांना धूप घालताना दिसत! त्यामुळे, तिसऱ्या महायुद्धाचे रौद्रभीषण पडघम वाजू लागल्याची दुर्दैवी परिस्थिती, सध्या निर्माण झालीय.




**या सगळ्या घटनाक्रमात आपल्या भारताची नेमकी भूमिका काय, हे आजमितीस ना आपलं परराष्ट्रखातं, ना पंतप्रधान-कार्यालय, ना अन्य कुणी सांगू शकेल. एकतर, आपल्या देशाचे पंतप्रधान, हे कायमच 'इलेक्शन-मोड'वर असतात, शेलक्या मर्जीतल्या पत्रकारांना पूर्वनियोजित मुलाखती देत असतात किंवा कुठलं तरी उद्घाटन करत असतात... अन्यथा, मोठ्या तिकीट-दरामुळे थोड्याच काळात रिकाम्या धावणाऱ्या 'वंदे भारत ट्रेन्स'ना हिरवा झेंडा (हिरव्या रंगाची 'ॲलर्जी' असली तरीही) दाखवत असतात; तरीही, ते एकाचवेळेस 'विश्वगुरु'ही असतात आणि त्यांचा जन्म 'अयोनिज' असल्याने जगभरातलं कुठलंही युद्ध रोखण्याची 'दैवीशक्ति'ही बाळगून असतात...भले मग, रशिया-युक्रेन व इस्रायल विरुद्ध हमास-हिजबुल्ला, ही प्रदीर्घकाळ चाललेली युद्धं कमालीची चिघळून, जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर का उभं राही ना! आपलं सगळंच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय राजकारण 'रामभरोसे' चाललंय...**

एक महत्त्वपूर्ण व भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत धोकादायक अशी गोष्ट म्हणजे, रशिया-चीन दरम्यानच्या "No Limits Friendship or Partnership" कराराच्या पार्श्वभूमीवर, रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी चीनला नुकतीच दिलेली भेट...

कधि नव्हे एवढे, रशिया-चीन हे दोन्ही तथाकथित साम्यवादी देश, जागतिक शीतयुद्ध समाप्तीच्या कालखंडानंतर सर्वच बाबतीत एकत्र आलेत. १९६२च्या चीनने भारतावर केलेल्या आक्रमणात, ''भारत आमचा 'मित्रदेश' असला; तरी, चीन आमचं 'बंधूराष्ट्र' आहे'', अशी रशियाने, चीनच्या बाजुने घेतलेली भूमिका, यासंदर्भात गांभीर्याने ध्यानात ठेवली पाहीजे. भारत-चीनदरम्यान सरहद्दीवरील वादासोबतच (गलवान-खोऱ्यातील ४०००चौ. कि.मी. पेक्षा जास्त भारतीय भूप्रदेश, लाल चीनने या मोदींच्याच कार्यकाळात बळकावलेला आहे) 'ब्रह्मपुत्रा नदी'चं पात्र बदलून, चीन त्या पाण्यावर हक्क गाजवू पहातोय (एक महाकाय जलविद्युत-प्रकल्प याअगोदरच उभारुन झालेला असून, दुसरा बाधण्याचं महाप्रचंड काम जोरात चालू आहे...तरीही, आपलं परराष्ट्रखातं डोळ्यावर कातडं ओढून आहे आणि 'विश्वगुरु' पंतप्रधान, साधं डोळे वटारुन चीनकडे बघायला तयार नाहीत).

**एवढं करुनही चीन थांबण्याचं कोणतंही लक्षण दिसत नाहीय; उलट 'अगस्ती-मुनी' बनून चीन सिंधू, सतलज व गंगा नद्यांचंही पाणी प्राशन करु पहातोय. त्यांचा प्रवाह देखील, आपल्या देशांतर्गत रोखण्याची क्षमता व राक्षसी इच्छाशक्ती चीन बाळगून आहे...ही, भारत-चीनमधील संभाव्य युद्धाची भयसूचक नांदी आहे!**

सध्या, एकूणच जगभरातील राष्ट्रप्रमुखांमध्ये अधिकाधिक अधम, खुनशी वृत्तीचा 'हुकूमशहा' कोण... याचीच अमानुष स्पर्धा लागलेली दिसते!

त्यामुळे, स्वाभाविकच, जग कमालीचं अशांत व अस्वस्थ झालंय. पं. जवाहरलाल नेहरुंसारख्या तरल, संवेदनशील व्यक्तित्वाने पुढाकार घेऊन 'अलिप्ततावादा'ची (NAM... Non-Aligned Movement) जी नैतिक भूमिका, आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली होती... त्यातून केवळ भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी प्रतिष्ठाच लाभली होती, असं नव्हे; तर, तत्कालीन खडतर स्थितीतही 'जागतिक-शांतता' बव्हंशी स्थिरावली होती.

...पण, आज नेहरुंसारखं हिमालयाच्या उंचीचं, आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेलं राजकीय-व्यक्तिमत्व, या जगात नाही, याची प्रलयंकारी किंमत तिसऱ्या महायुद्धाच्या रुपाने जगाला मोजावी लागू शकते, हे प्रकर्षाने ध्यानात आल्यावाचून रहात नाही...यापेक्षा, पं. जवाहरलाल नेहरुंना आजच्या दिवशी, मोठी आदरांजली कुठली असू शकते?

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

(संजीव चांदोरकरकृत खाजगी 'क्लासिकल-भांडवलशाही' आणि 'कॉर्पोरेट-भांडवलशाही' यातील मर्मभेदक भेद आणि विश्लेषण खालीलप्रमाणे मांडतानाच, त्यावरील 'धर्मराज्य पक्षा'तर्फे माझे विवेचन थोडक्यात सरतेशेवटी, मी आपल्यापुढे विचारार्थ ठेवत आहे, वाचण्याची कृपा व्हावी, ही नम्र विनंती... धन्यवाद!)

# खाजगी 'क्लासिकल-भांडवलशाही' आणि 'कॉर्पोरेट-भांडवलशाही'

मित्रहो, आपणा सगळ्यांनाच ''लोहा, लोहे को काँटता है'', हा हिंदी-सिनेमातला सलिम-जावेदछाप संवाद तोंडपाठ असतोच. त्याच न्यायाने, आम्हीसुद्धा या कॉर्पोरेट-भांडवलशाहीचे लाभार्थी असतानाही, तिच्या अंतरंगाचं भीषण स्वरुप जाणून त्याविरुद्ध लढण्यासाठी कॉर्पोरेट-भांडवलशाहीतूनच दूरदृष्टीने आमची संसाधनं उभी केली... आणि म्हणूनच केवळ, आज त्याविरुद्ध आम्ही काही लढा उभारु शकतोय! अन्यथा, ही करोडो आत्म्यांवर बलात्कार करणारी सैतानी 'कॉर्पोरेट-प्रवृत्ती' संसाधनाअभावी केवळ, व्यक्तिगत जिगरीवर आम्ही लढलो असतो; तर, आम्हा लढणाऱ्यांना ती केव्हाच, भुईसपाट करुन बसली असती!

**सध्याच्या कॉर्पोरेट-भांडवलशाहीत, जगभरात सर्वत्र, संवेदना-माणुसकी साफ बाजुला सारुन, नीज स्वार्थापोटी त्याला 'अर्थपूर्ण' साथ देणारी आपमतलबी व्यवस्थापकीय बुद्धीमंत मंडळी.... तुम्हाला पसंत असो वा नसो, रुचो वा न रुचो, जोरजबरदस्तीने तुमचं जगणं पूर्णतया नियंत्रित करु पहातायत.**

...हे सगळे हरघडी होणारे 'आत्म्यांवरचे बलात्कार', व्यावसायिकता अथवा प्रोफेशनॅलिझम् (professionalism) या गोंडस बिरुदाखाली बेमालूम दडपले जातायत! 'प्रोफेशन' म्हणजे, 'बसेन्स् ऑफ् इमोशन'... अशी बेछूट व्याख्याच, या सगळ्या कॉर्पोरेट-बदमाषांनी बनवून टाकलीय आणि अशातऱ्हेनं, जो व्यवस्थापक (manager) जेवढा जास्त 'प्रोफेशनल', तेवढा तेवढा तो कॉर्पोरेट-करियरच्या पायऱ्या भरभर वर चढत जाणार... मग, अशा माणुसकीशून्य आणि 'भावनिक अथवा आध्यात्मिक अंग' (emotional spiritual quotient) अंशालाही नसलेल्या व्यक्तित्वांची कॉर्पोरेटक्षेत्रातील भव्यदिव्य प्रगती पाहून, व्यवस्थापनातले इतरही अनेक झपाट्याने आणि अधिक वेगाने त्यांचं अनुकरण करत संवेदनशून्य बनत जाणार... हा एकूणच, समाजासाठी आणि निसर्ग-पर्यावरणासाठी फार मोठा धोका, म्हणूनच आजवर सिद्ध होत आलाय. 'खाजगी भांडवलशाही'पेक्षाही अमर्याद व अधिक सुसंघटित, सुसज्ज असलेली असलेली 'कॉर्पोरेट-भांडवलशाही', ही समाजासाठी आणि निसर्ग-पर्यावरणासाठी फारच घातकी ठरत आलीय... ती त्यामुळेच!

'कॉर्पोरेट-भांडवलशाही' हा 'अवाढव्यतेचा महारोग' (Disease Of GIGANTISM) आहे आणि त्यात, आपल्या मनुष्यजातीसह पृथ्वीमातेच्या अंताची बीजं रोवलेली आहेत!! अमानुष शोषण, जीवघेणी आर्थिक-विषमता आणि पुढील पिढ्यांचं भवितव्य अंधःकारमय करणारा निसर्ग-पर्यावरणाचा कमालीचा ऱ्हास..... ही या हृदयशून्य, नफेखोर अशा 'कॉर्पोरेट-भांडवलीप्रवृत्ती'चीच अपत्ये होतं आणि त्यातूनच, जगभरची आजची रक्तपिपासू-शोषक (Vampire State-System) व्यवस्था तयार झालीय !!!



तेव्हा, मित्रहो, आपण हे जाणून घेतलं पाहीजे की, संजीव चांदोरकरांसारखा अवलिया, समाजासाठी फार मोठं काम करतोय, जेव्हा तथाकथित सर्व उच्चशिक्षित मंडळी, या 'रक्तपिपासू-शोषक' (Vampire State-System) व्यवस्थेची आंधळी भलामण करण्यात आणि तिची तळी उचलण्यात व्यग्र आहेत आणि त्या महापातकात, केवळ, राष्ट्रवादाच्या अथवा जातधर्माच्या नावाने अहोरात्र ढोल पिटत, हाकारे देत.... एकप्रकारे सहभागी होत आहेत. **सगळ्याच अपेक्षा संजीव चांदोरकरांकडून पूर्ण होऊ शकणे नाही... त्यांच्यातल्या त्रुटींबाबत इतर कुणी जरुर काम करावं, आम्ही निश्चितच त्यांना त्याबाबत पाठींबा देऊ (पण, आंधळा पाठींबा देणार नाही किंवा showcase म्हणून, दुसरीकडे लक्ष वेधावं, म्हणून फसवण्यासाठी कुणी केलेल्या छोट्यामोठ्या चांगल्या बाबींनाही पाठींबा देणार नाही; कारण, व्यवस्थेची पालखी उचलणाऱ्या भोयांनी उत्तमरित्या वठवलेलं, ते सोंग असतं... ''खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे'' असणाऱ्या व्यवस्थेचा मूळ उद्देश अतिशय धोकादायक, घातकी असतो).**

मित्रांनो, असं फार कमी वेळा होतं की, या TISS च्या सन्माननीय प्राध्यापकाचे विचार मला कुठे रुचत नाहीत; पण, मतभेद हे थोडेबहूत रहाणारच... परंतु, बहुतांशी त्यांचे विचार जनजागृतीच्या दृष्टीकोनातून क्रांतिकारकच होतं... त्यांना माझा आणि माझ्या 'धर्मराज्य पक्षा'च्या कार्यकर्त्यांचा त्रिवार सलाम !!! **.... *राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)

''सर, तुम्ही सतत कॉर्पोरेट भांडवलशाहीवर सारखी टीका का करत असता ? व्यक्तिगत भांडण असल्यासारखे किंवा सुपारी घेतल्यासारखे...''

सोशल-मीडियावरचा एक तरुण मित्र, त्याच्या टपोरी भाषेत मला विचारत होता; मी त्याच्या ''सुपारी'' शब्दाकडे, खटकला तरी, दुर्लक्ष केले आणि माझी पोझिशन सांगितली.

सर्वप्रथम मी खासगी मालकीवर आधारित क्लासिकल भांडवलशाही आणि कॉर्पोरेट भांडवलशाही यात मूलभूत फरक करतो; ही दुसरी मानवजातीसाठी, पृथ्वीसाठी घातकी सिद्ध होत आहे!

**माझ्या कॉर्पोरेट भांडवलशाहीच्या टीकेबाबत :**

एकतर माझे कॉर्पोरेट भांडवलशाहीशी काहीही व्यक्तिगत वैर नाही; मी अनेक वर्षे चांगल्या पगारावर कॉर्पोरेट-क्षेत्रात नोकरी केली आहे... मी त्याचा 'लाभार्थी' आहे

माझी त्या प्रणालीवरची टीका राजकीय भूमिकेतून आहे....

आर्थिक-विषमता व त्यातून तयार होत असलेले सामाजिक, राजकीय, वांशिक ताणतणाव, दारावर धडका मारणारे पर्यावरणीय अरिष्ट ही, सारी कॉर्पोरेट भांडवलशाहीची देणी आहेत.

दुसरे कारण, त्या प्रणालीने ब्रेन-वॉश केलेले अनेक नॅरेटिव्ह त्याच्या सोयीचे, दुटप्पीपणाने ओतप्रोत भरलेले आहेत... ती प्रणाली, बौद्धिकदृष्ट्या अप्रामाणिक आहे.

तिसरी गोष्ट, मी नेहमी ''प्रणाली/सिस्टीम'' बद्दल बोलतो; म्हणजे, अमेझॉनवर टीका करताना फ्लिपकार्ट कशी चांगली, असे कधीच मांडत नाही....

**आता, माझ्या ''सुपारी'' घेण्याबद्दल....**

मित्रा, आजच्या ४० पैसे ट्रोलवाल्यांच्या जमान्यात कोणाचेही समर्थन किंवा विरोध फक्त, पैसे घेतलेली माणसेच करत असतात, असा तुझा समज झाला असला तर, दोष तुझा नाही,

**एक गोष्ट लक्षात ठेव....**

'कॉर्पोरेट-भांडवलशाही'चे जाहीर व्यासपीठावरुन समर्थन करणारे जे कोणी असतील; त्यांना, ते काम करण्यासाठी किमान काही पैसे मिळण्याची शक्यता तरी तयार होते... कारण, ते ज्यांची बाजू मांडतात त्यांच्याकडे भरपूर पैसे तरी आहेत.

मी, जर, कोट्यवधी गरीब सामान्य नागरिकांच्या बाजूने आर्थिक-विचारांची मांडणी करत असेन; तर, मला कोण पैसे देणार? जे लाभार्थी होऊ शकतात; ते स्वतःच, एव्हढे वंचितावस्थेत असताना....

मी कधीच तुला माझ्या मताचा हो, असा आग्रह धरणार नाही...

बौद्धिक प्रामाणिकपणा आणि हृदयात सर्व माणसांबद्दल, वनस्पती-प्राणिमात्रांबद्दल संवेदनशीलता... एवढ्या दोन गोष्टी, मात्र जरुर आत्मसात कर आणि मरेपर्यंत त्याची ज्योत तेवती ठेव....

***....संजीव चांदोरकर***

# भीड, भेडियों की होती है.... ओशो

ज्या माणसाकडे मुळातून नीतिमत्ता, स्वतःचा विचार–विवेक किंवा सत्याची चाड फारशी नसते... असा माणूस मोठ्या अडचणीचा प्रसंग येताच कुठल्यातरी भितीपोटी भयग्रस्त होऊन किंवा दाखवल्या गेल्या आमिषाला बळी पडून, अवतीभवतीच्या पातकी ''गर्दीचा किंवा झुंडीचा एक घटक'' बनू पहातो... त्यात, त्याला फार सुरक्षित झाल्यासारखं वाटतं.

एकदा का तो त्या 'झुंडीचा भाग' बनला की, कुठल्या क्षणी त्याचं 'माणूसपण' संपतं आणि तो त्या 'गर्दीचा एक घटक' म्हणून, अनेकांचे संसार उध्वस्त करायला तो लागतो किंवा मनुष्यहत्या करत पशूसारखा भयंकर पापाचरण करायला लागतो; ते त्याचं त्यालाच धड कळत नाही!

आजवर मानवी इतिहासात जी महाभयानक पातकं घडलीयतं; ती झुंडीच्या–गर्दीच्या हातून घडलीयतं... व्यक्तिच्या हातून त्यामानानं किरकोळच म्हणावा, असा साधारण गुन्हेगारी व्यवहार घडतं आलाय!

**व्यक्तिगत, एकेकटा माणूस, स्वप्नातही विचार करु शकणार नाही; असा पाशवी व्यवहार, गर्दीचा घटक म्हणून, माणूस सहजी करुन बसतो.... कारण, त्यात त्याला स्वतःला, त्या पापांची जबाबदारी स्विकारायला लागेल किंवा, त्याच्या सदसद्विवेक बुद्धीला टोचणी लागेल... अशी सरळ व्यवस्था नसते. त्यामुळे, भितीपोटी वा स्वार्थापोटी अंध झालेल्या त्याच्या नजरेत, हे पापाचरण खुपत नसल्यानं, पश्चातापाचे भाव त्याच्या मनी नसतात... म्हणून, तो मनातून एवढं पापाचरण करुनही, निश्चिंत राहू शकतो.**

**अनेक धार्मिक–जातीय दंगलींनंतर अनेकांच्या संसाराची राखरांगोळी करणाऱ्यांना, अगदी निष्पाप तान्ह्या बाळांचीही हत्या करणाऱ्या हत्याऱ्यांना... नंतर, विचारणा केल्यावर ते, ''माझ्याहातून ते भयंकर पातक घडलं खरं; पण, ते कसं घडलं, हे सांगता येत नाही'', अशातऱ्हेचं भाष्य करतात!**

**झुंडीत एकदा सामील झाल्यावर कुणाच्या तरी सांगण्यावरुन, वरच्या आदेशावरुन त्या गर्दीचा एक भाग बनून, आपण हे कृत्य करत आहोत... तेव्हा, ते पाप दुसऱ्याचं, माझं नव्हे; अशी स्वतःच्याच मनाची ते बेमालूम फसवणूक करत रहातात.**

शिवाय, आपल्या या भयंकर पापाचरणाला, मुलामा चढवायचा म्हणून, सज्जन–सत्प्रवृत्त व्यक्तिंविरुद्ध, संस्थांविरुद्ध कुठल्यातरी अफवा किंवा भूलथापांच्या वावड्या (हल्ली, त्यासाठी, सोशलमिडियाचा सढळ वापर केला जातोय) सतत उडवत रहातात आणि मग, त्यामुळेच, आमच्या हातून हा असा पापी 'व्यवहार', ही पापी कृत्यं घडतायतं... असा, अपराधीपणातून स्वतःची मनोमन 'सुटका' करुन घेण्याचा केविलवाणा प्रयत्न ते करु पहातात.

यावर, कडी म्हणजे, ''आपणासारिखे करिती तत्काळ'', असा संसर्गजन्य मानसिक रोग जडलेली ही माणसं, एकदा का 'त्या पातकी गर्दी'चा हिस्सा बनली की, इतर अनेकांना आपल्यासोबत खेचून घेऊन, 'त्या झुंडी'ची मात्रा व त्याद्वारे, आपली सुरक्षा, ते वाढवू पहातात! एवढंच नव्हे; तर, ते त्या ''झुंडीपेक्षाही अवसानघातकी भाषा'' आपल्या तोंडातून आपसूक उच्चारु लागतात... जी भाषा, ते उभ्या हयातीत कधि उच्चारु शकतील; यावर, त्यांच्या स्वतःसह, त्यांच्या परिचितांचाही विश्वास बसणं कठीण!

ज्या, कामगारक्षेत्रात आम्ही तीन तपांहून अधिक काळ कार्यरत आहोत, जीवाची बाजी लावायला लागणाऱ्या शेकडो संघर्षांचे साक्षी आहोत; तिथे तर, प्रत्येक कामगारलढ्यात, व्यवस्थापकीय मंडळींच्या अतिशय घातकी, पातकी व षडयंत्री कारभारामुळे (ज्याला, मी सातत्याने, 'कंपनी–दहशतवाद' अथवा Corporate-Terrorism म्हणतं आलोय) असा दारुण अनुभव थोड्याफार फरकाने आमच्या पाचवीला पुजलेला असतोच... फक्त, **एकूणच, महाराष्ट्रातल्या उरल्यासुरल्या संपूर्ण कामगार–चळवळीवर बरावाईट परिणाम घडवू शकण्याची मोठी शक्यता असणाऱ्या, सध्याच्या आम्ही लढत असलेल्या नवी मुंबई परिसरातील कामगार–संघर्षात, या ''कामगारहिताविरुद्ध सैतानीवृत्तीने कार्यरत असलेल्या.... 'गारद्यांच्या गर्दीच्या मानसिकते'नं शकुनी, सूर्याजी पिसाळ, मीर जाफरसारख्या अवलादींनाही मान खाली घालायला लावणारा शरमेचा कळस गाठलायं, इतकंचं!!!''**

(संदर्भः ''झुंडीचं मानसशास्त्र'', या विषयावरचं ओशोंचं गाजलेलं प्रवचन)

***..... राजन राजे*** (अध्यक्षः धर्मराज्य पक्ष)

# जनाची नाहीतर मनाची तरी, ठेवा हो....

एखाद्या देशाचा पंतप्रधान, किती उठसूठ खोटं बोलणारा व देशाची सतत किती दिशाभूल करणारा असावा, याला काही मर्यादा...???

तामीळनाडू भेटीत, ज्या 'कचाथीवू' (Katchatheevu) बेटावरुन मनमोहनसिंग सरकारवर पं. नरेंद्र मोदींनी टीकेचं एकच मोहोळ उठवलं (अर्थातच, लोकसभा–निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुद्दामहूनच), ते 'कचाथीवू' बेट, हे श्रीलंकेतील एक निर्जन बेट.

१९२१ पासून या निर्जन बेटावर ब्रिटीश–सिलोनचे (आताची श्रीलंका) नियंत्रण होते. भारत सरकारचं त्यावर कधिही कुठलंही नियंत्रण नसतानाही, हे अगदी छोटेखानी बेट (क्षेत्रफळ अवघे २८५ एकर) भारत आणि श्रीलंका यांच्यात १९७४ पर्यंत विवादीत राहिले व त्यानंतर, भारताने या निर्जन–बेटावरील श्रीलंकेचे सार्वभौमत्व मान्य केले!

**आता मजा बघा...याच नरेंद्र मोदी सरकारने वर्ष–१९४७पासून विवादीत असलेला भारत–बांगलादेश सीमातंटा संपुष्टात आणण्यासाठी, ६ जून–२०१५ रोजी जमीन सरहद्द करार** (Land Border greement... LB) **करुन तब्बल १०,००० एकर सुपीक जमीन (ज्यावर फार मोठ्याप्रमाणावर लोकं रहात होती; म्हणजे, 'कचाथीवू' बेटासारखी, ती जमीन 'निर्जन' बिलकूल नव्हती) अधिकची बांगलादेशाला 'दान' दिली (आपण बांगलादेशाला १७,१७०.६३ एकर जमीन दिली आणि त्याबदल्यात, बांगलादेशने आपल्याला फक्त ७,११०.०२ एकर एवढीच जमीन, या LB करारान्वये दिली)...पण, नरेंद्र मोदी त्याविषयी ब्र काढत नाहीत!**

...ही अश्लाघ्य स्वरुपाची बेईमानी तर आहेच; पण, अशा वाईट–घृणास्पद रितीने काँग्रेस–सरकारला नाहक बदनाम करण्याची मोहिम सुरुच ठेवणे, ही अतिशय शरमेची बाब असून, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिष्ठा खाली आणणारी आहे.

**लक्षात घ्या, याअगोदरच, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अटक प्रकरणावरुन व लोकसभा–निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसची बँक–खाती गोठवणे वगैरे बाबींवरुन जर्मनी, अमेरिका, संयुक्त–राष्ट्रसंघ** (UNI) **आणि म्नेस्टी इंटरनॅशनल यांनी भारतावर कडक टीका केलेली आहे. तशीच टीका, महिला–पहेलवानांवरील दिल्लीत झालेल्या अत्याचारांवरुन आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीनेही केली होती.**

शिवाय भारत, अमेरिका, जपान व ऑस्ट्रेलिया या देशांनी मिळून बनलेल्या 'सामरिक सुरक्षा संवादा'तून (QUD OR Quadrilateral Security Dialogue) भारताची हकालपट्टी करण्यात आल्याचं (सरकारी दुजोरा न मिळालेलं) वृत्त आहे. मात्र जशी गलवान खोऱ्यातील भारताची जवळपास ४००० चौ.कि.मी. जमीन चीनने घशात घातल्याची बातमी, या बदमाष 'गोदी–मिडीया'ने दाबून टाकली (त्याविरोधातच, लडाखचे ख्यातनाम सामाजिक–कार्यकर्ते 'सोनम वांगचुक' यांनी नुकतंच २१ दिवसांचं उपोषण केलं होतं व ते आता या घटनेच्या निषेधार्थ, लडाख ते चीनने बळकावलेल्या गलवान–खोऱ्यापर्यंत पायी चालत जाणार आहेत)...तशाच, या महत्त्वपूर्ण बातम्या, 'गोदी–मिडीया'तून नेहमीप्रमाणेच गायब आहेत!

आपल्याच दळभद्री–कर्मदरिद्री वृत्तीमुळे, आपणच आपल्यावर गेली सलग दहा वर्षे लादून घेतलेलं, हे फार मोठ्या दुर्दैवाचं ओझं...निदान, २०२४च्या लोकसभा–निवडणुकीच्या मतपेटीतून तरी, आपण आपल्या मनगुटीवरुन उतरवून, दूर फेकून देतो की, नाही...ते, येणारा काळच ठरवेल, धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



*बौद्धपौर्णिमेनिमित्त, ठाणे शहराच्या कोपरी परिसरात, 'गौतम मित्र मंडळा'च्या वतीने, बुद्धपौर्णिमा व संयुक्त जयंती महोत्सव-२०1४ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २३ मे-२०२४ ते दि. २७ मे-२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली होती. यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्री. राजेश गाडे यांनी, मा. राजन राजे यांचा, शाल-पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सहृदय सत्कार केला. याप्रसंगी 'गौतम मित्र मंडळा'चे उपाध्यक्ष श्री. अमुल कदम, सेक्रेटरी श्री. कुंदन सपकाळे, खजिनदार श्री. सुमित कदम आणि अनंता चंदने यांच्यासह, मंडळाचे पदाधिकारी-कार्यकर्ते तसेच, स्थानिक नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.*

*जे खूप सखोल वाचतात*
*ते अनेकजण लेखक नसतात*
*आणि जे खूप लिहितात*
*ते व्यासंगी वाचक नसतात*
*जे वाचक आणि लेखक असतात*
*ते प्रभावी वक्ते नसतात*
*आणि जे वक्ते असतात*
*ते अनेकदा व्यासंगी लेखक, वाचक नसतात*
*जे विचारवंत आणि वक्ते असतात,*
*ते अनेकदा रस्त्यावर उतरत नाहीत*
*आणि जे चळवळीत काम करतात*
*ते अनेकदा विचारवंत, वक्ते नसतात*
*या चारही गोष्टी बाबासाहेबांनी पूर्ण क्षमतेने केल्या हे त्यांचे वेगळेपण...*

*...हेरंब कुलकर्णी*



मा. उद्धवजी ठाकरे यांनी दि.१६ मे-२०२४ ठाण्यातील आपल्या प्रचारसभेत आवर्जून 'धर्मराज्य पक्षा'ध्यक्ष राजन राजे यांच्या कामगारकार्याबद्दल व नेतृत्त्वाबद्दल गौरवपूर्ण उल्लेख केला...त्याबद्दल समस्त 'धर्मराज्य पक्ष परिवार' व महाराष्ट्रातील तमाम कामगार-कर्मचारीवर्ग मा. उद्धवजींचा नितांत आभारी आहे... या निमित्ताने गुलामगिरी व नवअस्पृश्यतास्वरुप असलेल्या 'कंत्राटी-कामगारपद्धती'विरोधात, प्रथमच महाराष्ट्राच्या एका मोठ्या राजकीय-व्यासपीठावरुन जोरदार आवाज निनादला, हे विशेष!

राहुल गांधींनीही काँग्रेसच्या जाहीरनाम्यात कामगारांसंदर्भात काही सकारात्मक बाजू याअगोदरच मांडलेली आहे.

त्यामुळे, या लोकसभा-निवडणुकीत 'इंडिया-आघाडी'च्या विजयापश्चात 'कंत्राटी-कामगारपद्धत' आणि नरेंद्र मोदी सरकारने कामगार-कर्मचारीवर्गावर लादलेल्या '४ काळ्या कामगार-कायद्यां'नी बनलेल्या 'काळ्या कामगार-संहिते'विरोधात, सरकारतर्फे ठोस पावलं उचलली जाण्याचे महत्त्वपूर्ण संकेत मिळालेत...लाख लाख धन्यवाद, उद्धवजी!




मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करूया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित

'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!







राजन राजे
(अध्यक्ष)

महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)